शुक्रवार, २५ ऑगस्ट २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● FRIDAY 25 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-28 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# सरकारने फसवले; शेतकरी पुन्हा आक्रमक

## नाफेड खरेदी करत नसल्याने नाशिक जिल्ह्यात पुन्हा कांदा लिलाव बंद करून रास्ता रोको

आधुनिक केसरी न्यूज


**किरणकुमार आवारे**
**निफाड : केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर अवास्तव असे ४० टक्के शुल्क लावले आहे. त्यामुळे कांदा भाव पडले आहेत. त्यातच आज दि.२४ ऑगस्ट रोजी पुन्हा सुरु झालेल्या बाजार समित्यांमध्ये नाफेड खरेदीसाठी उतरले नाही व जाहीर भावापेक्षा कमी भावाची बोली लागल्याने शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडत रास्ता रोको आंदोलन सुरू केले.**

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर अवास्तव शुल्क लावल्याने नाशिक जिल्ह्यातील तब्बल १४ बाजार समित्यांनी बंदची हाक दिली होती. केंद्रीय आरोग्यराज्यमंत्री भारतीताई पवार यांनी काल दि.२३ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात व्यापारी, शेतकरी यांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत आज दि.२४ ऑगस्ट पासून बाजार समित्यांमध्ये कांदा खरेदीसाठी नाफेड उतरेल असे आश्वासन त्यांनी दिले. नाफेड शेतकऱ्यांकडून २४१० रुपये प्रति क्विटल भावाने कांदा खरेदी करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आज बाजार समित्या चालू झाल्या. मात्र व्यापाऱ्यांनी सरासरी १६०० रुपये अशी नाफेड पेक्षा कमी बोली लावली. खुल्या बाजारात नाफेड लिलावात दिसले नाही त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी घोषणा देत लिलाव बंद पाडले. नाशिक जिल्ह्यातील चांदवड, पिंपळगाव, उमराणे, लासलगाव बाजार समिती कांदा लिलाव भाव पडल्याने बंद करण्यात आले आहेत. ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन सुरू आहे. चांदवडच्या मुंबई आग्रा महामार्गावरील चौफुलीवर सुमारे दोन तास आंदोलन करण्यात आले. आंदोलकांशी नाफेडच्या अधिकाऱ्यांनी दूरध्वनीवर चर्चा केली. त्यानंतर सोमवारपर्यंत नाफेडने खरेदी सुरू न केल्यास तीव्र आंदोलन कारणा-याचा इशारा देत आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र त्याचवेळी प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष गणेश निंबाळकर यांनी आंदोलनातून बाजूला होत पुन्हा कार्यकर्त्यांसह रस्त्यावर झोपून आंदोलन सुरू केले. पोलिसांनी बळाचा वापर करत आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेत वाहतूक सुरळीत केली.



नाफेडची खरेदी हि अदृश्य असून ती भुतासारखी आहे . ती कुणालाही दिसत नाही . मुळात जेव्हा कांद्याला २ ते ३ रु किलो भाव असतो तेव्हा नाफेडने बाजारात उतरून भाव वाढीसाठी प्रयत्न करायचे असतात . मात्र इतिहासात पहिल्यांदा भाव पाडण्यासाठी नाफेड बाजारात उतरत आहे . केंद्र सरकारने नाफेड मार्फत खरेदी करावी हि आमची मागणीच नाही तर केंद्र सरकारने निर्यात होणाऱ्या कांद्यावर ४० टक्के अवास्तव शुल्क लावले आहे ते पूर्ण रद्द करावे . **संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर अवास्तव शुल्क लावल्याचा निषेधार्थ नाशिक जिल्ह्यातील कांदा लिलाव बंद होते . मात्र या काळात व्यापाऱ्यांनी त्यांचा माल बाहेर पाठवत फायदा करून घेतला . केंद्र सरकार नाफेडमार्फत कांदा खरेदी करते मात्र, ही खरेदीच संशयास्पद आहे . नाफेडने खुल्या बाजारात लिलावात उतरले पाहिजे, त्याचबरोबर त्यांनी एकूण खरेदी केलेला कांदा, शेतकरी यादी, त्यानंतर होणारी नासधूस याचा लेखा जोखा जनतेसमोर मांडला पाहिजे . **वाल्मिक सांगळे, रयतक्रांती संघटना, नाशिक जिल्हाध्यक्ष**



केंद्र सरकार नाफेड नाफेड करत आहे . मात्र नाफेडची खरेदी हि जखम मांडीला व मलम शेंडीला अशीच आहे . त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने कांदा निर्यातीवर लावलेले ४० टक्के शुल्क तातडीने मागे घेऊन निर्यातीला प्रोत्साहन द्यावे . आगामी काळात कांदा साखळीत हस्तक्षेप करू नये . अन्यथा सरकारला आगामी निवडणुकीत याचे गंभीर परिणाम भोगावे लागण्याची श्यक्यता आहे . **ज्ञानेश्वर तासकर, कांदा उत्पादक शेतकरी**

## पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्या इमारती

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** हिमाचल प्रदेश, उत्तराखंडसह उत्तर भारतात तुफान पाऊस सुरू आहे. अनेक भागात ढगफुटी, पूर आणि दरड कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत. दरड कोसळण्याच्या घटनांमुळे अनेक राज्यातले ५०० हून अधिक रस्ते बंद आहेत. ढगफुटी होऊन हिमाचल प्रदेशातलं जनजीवन विस्कळीत झालं आहे. अतिवृष्टीमुळे डोंगराळ भागांमधली परिस्थिती खूपच बिकट बनली आहे. हिमाचल प्रदेशातील कुल्लू येथे गुरुवारी झालेल्या पावसामुळे अनेक बहुमजली इमारती पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्या. इमारती कोसळल्याचा व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अतिवृष्टीमुळे सुरू असलेला हा भीषण विध्वंस व्हिडीओमध्ये दिसत आहे. अतिवृष्टीमुळे या निसर्गरम्य ठिकाणी सध्या विध्वंस सुरू आहे. कुल्लू येथील नवीन बसस्थानकाजवळ नुकतीच एक मोठी नैसर्गिक दुर्घटना घडली आहे. अवघ्या काहीच सेकंदात या भागातल्या ७ इमारती एकामागून एक कोसळल्या. सततच्या पावसामुळे या इमारतींना भेगा पडल्या होत्या. त्यामुळे प्रशासनाने तीन दिवसांपूर्वीच या इमारती रिकाम्या केल्या होत्या. येथील आठ धोकादायक इमारतींमधील लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. त्यापैकी ७ इमारती कोसळल्या आहेत. एक धोकादायक इमारत सध्या तरी उभी आहे. परंतु, ही इमारतदेखील कधीही कोसळू शकते, असं सांगितलं जात आहे. हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसाचा कहर सुरूच आहे. शिमल्यामध्ये २०१७ मिमीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. शिमल्यात पावसाने १२२ वर्षांचा विक्रम मोडित काढला आहे. हिमाचल प्रदेशमधील मंडी, शिमला आणि सोलानमध्ये गेल्या २४ तासांत ढगफुटीच्या ४ घटना घडल्या आहेत. पावसामुळे काल ११ जणांना जीव गमवावा लागला आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांचा २८ ऑगस्टपासून जनता दरबार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सर्वसामान्य जनतेशी संवाद साधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांचा जनता दरबार पक्षाच्या प्रदेश कार्यालयात दि. २८ ऑगस्टपासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांनी दिली आहे. मंगळवार, बुधवार आणि गुरुवार ९ ते ११ वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मंगळवारी ११ ते दुपारी १ वाजता क्रीडा मंत्री संजय बनसोडे, दुपारी २ ते ४ कृषीमंत्री धनंजय मुंडे, सायं. ४ ते ६ मंत्री छगन भुजबळ हे उपस्थित राहणार आहेत. तर बुधवारी सायं. ४ ते ६ सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मारावबाबा आत्राम, गुरुवारी स. ११ ते दुपारी १ वाजता मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील, सायंकाळी ५ ते ७ महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे उपस्थित राहणार आहेत.

# पांढरं सोनं पिकविणाऱ्या जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येची धग कायम

## ३७ वर्षांपूर्वी करपे यांनी कुटुंबासह केली होती आत्महत्या; बारा दिवसात दोघांनी संपवले जीवन

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**
**यवतमाळ :** निसर्गाच्या लहरीपणामुळे



जगाचा पोशिंदा शेतकरी संकटात सापडला आहे. अनेक समस्यांच्या गर्तेत सापडलेला शेतकरी विषाचा घोट किंवा गळफास घेऊन आत्महत्या करीत आहे. त्यामुळे पांढर सोने पिकविणारा जिल्हा अशी ओळख असलेल्या यवतमाळ जिल्हा आता शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून देशात ओळखला जात आहे.

19 मार्च 1986 रोजी महागाव तालुक्शातील चिलगव्हाण येथील शेतकरी साहेबराव करपे यांनी पत्नी व चार मुलांसह वर्धा जिल्ह्यातील दत्तपूर येथील मनोहर कुष्ठधामात आत्महत्या केली होती. या घटनेला ३७ वर्ष झाले आहे. या घटनेची पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद घेण्यात आली आहे. त्यानंतर आता पुन्हा महागाव तालुक्यात आत्महत्येचे सत्र सुरु झाले आहे. काही दिवसापूर्वी तिवरंग येथील शेतकऱ्याने आत्महत्या केली होती. काल पुन्हा अंबोडा येथे एका शेतक-याचे विषाचा घोट प्राशन करुन आत्महत्या करीत जगाचा निरोप घेतला आहे. महागाव तालुक्यातील अंबोडा येथील शेतकरी गजानन फकीरा गायकवाड (४३) यांनी शेतामध्ये आत्महत्या केल्याची घटना दिनांक २२ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. गजानन गायकवाड आपली वडिलोपार्जित शेतजमिनीची वहिती करायचे. यावर्षी त्यांनी आपल्या शेतात सोयाबीन पीकाची लागवड केली होती. दिनांक २१, २२ जुलै रोजी अतिवृष्टीने नाल्यांच्या पुरात सोयाबीन पीक पूर्णता खरडून गेल्याने शेतकरी हताश झाला होता. शेतीचे कर्ज कसे फेडायचे, घर प्रपंचाचा गाडा कसा हाकायचा या विवचंनेत होता. दोन दिवसापूर्वी रात्रीच ते घरातून निघून गेले. दुसऱ्या दिवशी शेतात त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी विषयाची बाटली आढळून आली. नातेवाईकांनी महागाव पोलिसांना या घटनेची माहिती दिली. १२ दिवसापूर्वी तीवरंग येथेही एका शेतकऱ्याने गळफास लावून आत्महत्या केली होती. ही घटना ताजी असताना आता दुसरी घटना अंबोडा येथे घडली. घटनेची माहिती मिळताच महागाव पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. शविच्छेदन सवना येथील ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले. अंबोडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मृतक गजानन यांच्यामागे पत्नी, दोन मुले, आई-वडील, भाऊ, बहीण असा मोठा आप्त परिवार आहे.


**राज्य सरकारच्या अनास्थेचे बळी**
शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी राज्य सरकारची इच्छा शक्ती नसून, ते संवेदनशिल नाही . शेतकरी आत्महत्येच्या आत्महत्येचा विषय गार्भीयाने घेत नाही . त्यामुळे शेतकरी हे अनास्थेचे बळी पडत आहे . मागील महिन्यात अतिवृष्टी झाली असून, प्रचंड नुकसान झाले आहे . शासनाने मदतीची घोषणा केली . परंतू अनेक शेतकरी मदतीपासून वंचित आहे . शेतकऱ्यांच्या थेट खात्यात मदतीची रक्कम टाकावी अशी मागणीही कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे केली आहे . मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतांना छत्रपती शिवरायाचे नाव घेवून शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नये अशी शपथ दिली होती . त्यानंतरही शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरु आहे हे खेदाची बाब आहे अशी प्रतिक्रीया शेतकरी नेते मनिष जाधव यांनी दिली . सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत जमा करण्याची गरज आहे असेही ते म्हणाले .

**१९ दिवसांत १९ आत्महत्या :** यवतमाळ जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येचे सत्र थांबायला तयार नाही . दिवसें दिवस शेतकरी आत्महत्येच्या घटना वाढत आहे . गेल्या आठ महिन्यात १६८ शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहे . तर गेल्या १९ दिवसात १९ शेतक-यांनी आपली जिवनयात्रा संपविली आहे . म्हणजे यवतमाळ जिल्ह्यात एका दिवशी एक शेतकरी आत्महत्या होत असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे .



**शेतकरी आत्महत्या नसून सरकारने पाडले खून :** शेतकरी आत्महत्या या आत्महत्या नसून सरकारने पाडलेले खून आहे . निसर्गाचा अन् सरकारचा लहरीपणा यामुळे शेतकरी पुरता खचला आहे . शेतकरी जगू नये हेच सरकारचे धोरण आहे . महागाव तालुक्यातील चीलगव्हान येथील साहेबराव करपे यांनी 1986 मध्ये सहकुटुंब आत्महत्या केली होती .ते सत्र आज ही सुरू आहे . अशी प्रतिक्रीया जेष्ठ पत्रकार संतोष अरसोड यांनी दिली आहे .

**शेतकऱ्यांनी टोकाचे पाउल उचलू नये :** निसर्गाचा लहरिपणा, सतत होणारी नापिकी, कर्ज बाजारीपणामुळे शेतकरी नैराश्येतच्या गर्तेत सापडला आहे . त्यामुळे शेतक-यांच्या मनात आत्महत्येचा विचार घोघावत आहे . शेतक-यांनी टोकाचे पाउल उचलु नये . आत्महत्या केल्याने आपले प्रश्नह सुटनार नसुन कुटुंब उघड्यावर पडेल . शेतकऱ्यांनी खचुन जावू नये असे आवाहन मनिष जाधव यांनी केली . वेळ प्रसंगी आपण शेतकऱ्यांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी सरकार विरोधात रस्त्यावर उतरुन लढाई लढु असेही ते म्हणाले .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

श्यामराव, श्यामलाताई आणि भगवानराव यांच्याकडून मिळालेल्या माहितीचा पिंकी आणि राजेश यांना आपल्या शाळेत माहिती सांगताना खूप उपयोग झाला. १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनी पिंकीने स्वदेशी खाद्यपदार्थ आणि वृक्ष आदींच्या उपयोगितेवर सर्वांसमोर एक छोटेसे भाषण केले. तिच्या भाषणाची शाळेतील मुख्याध्यापकांनी आणि प्रमुख अतिथींनी खूप तारीफ केली. शाळेतर्फे तिला क्रांतिवीरांच्या जीवनावर आधारित एक पुस्तक बक्षीस म्हणून देण्यात आले. राजेशने स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित चित्रप्रदर्शनात हेमाडपंती शिव मंदिर, वृक्षांची चित्रे, त्यांची माहिती आणि उपयोग या सगळ्या गोष्टींचा समावेश असलेली सुंदर चित्रे काढली. ही वेगळ्या विषयावरील चित्रे सर्वांची लक्ष वेधून घेत होती. शाळेने त्याची चित्रे शाळेच्या मासिकात घेण्याचे ठरवले. आईबाबांनी पिंकी आणि राजेशला या सगळ्या गोष्टींबद्दल खूप शाबासकी दिली. मुलांना या सगळ्या गोष्टी भगवानकाकांना केव्हा सांगतो असे झाले होते. योगायोगाने दुसऱ्या दिवशी शाळा आणि महाविद्यालयाला पारशी नववर्षाची सुटी होती. श्यामरावांनी भगवानरावांना फोन करून बोलावून घेतले. येताना भगवानराव सोबत भार्गवी वहिनी आणि त्यांचा मुलगा चैतन्य यांनाही सोबत घेऊन आले. आज सगळ्यांचे जेवण श्यामरावांकडेच होणार होते. सगळ्यांच्या छान गप्पा झाल्या. पिंकी आणि राजेशने आपण पाहिलेल्या सगळ्या गोष्टी भार्गवीकाकूंना आणि चैतन्यला सांगितल्या. ते म्हणाले आपण सगळे एकत्रच पुढील वेळी अशा सहलीला जाऊ. आता मुले भगवानरावांच्या भोवती जमली. पिंकी म्हणाली, ' काका, मागच्या वेळी तुम्ही म्हणाला होता की आणखी छान माहिती, गोष्टी तुम्हाला सांगेन म्हणून. आता आपल्याला वेळ आहे तर सांगा ना ! ' राजेशने पण ' हो काका, सांगा ना...' असे म्हणत पिंकीला साथ दिली. तर चैतन्य सुद्धा ' हो बाबा, आता तुम्हाला काहीतरी सांगावेच लागेल, ' म्हणाला. भगवानराव हसत हसत श्यामरावांना म्हणाले, ' हे चांगले आहे बाबा. तुझ्याकडे आलो की चांगलेच काम लागते ! कॉलेजात मला शिकवण्याचा पगार मिळतो बरं का ! इथे मात्र काही नाही. ' श्यामराव म्हणाले, ' अरे भगवान, आज सगळ्यांना मस्त फर्मास जेवण आहे ना माझ्याकडून ! शिवाय मुलांना तुझं सांगणं आवडतं त्याला मी काय करणार ' अरे श्याम, मी गमतीनं म्हटलं. मला काही नको. राजेश आणि पिंकी माझी पण आवडती मुलं आहेत. त्यांना काही सांगण्यात मला आनंदच आहे.



समृद्ध प्राचीन भारत



# आनंदी पहाट

## मानसिक स्वास्थ्य भावनात्मक बाबींशी निगडित

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या अंतर्मनातील आनंद निर्माण करण्याची बाब ही जितकी महत्वाची असते तितकेच सौंदर्याला देखील महत्व असते. आपण आपल्या जीवनात सौंदर्याचा शोध घेत असतो तेव्हा ते अधिकाधिक कसे मिळवता येईल ह्यासाठीच प्रयत्नशील असतो. सुंदरता, ही आपल्या प्रत्येक गोष्टीकडे बघण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते. प्रत्येक गोष्ट ही सुंदरच असते, अशा सकारात्मक दृष्टीने आपण बघितले की अशावेळी त्या गोष्टी मध्ये सौंदर्याचा साक्षात्कार व्हायला लागतो. आपल्या जीवनामधील सौंदर्याचे स्थान आणि महत्व हे तेव्हाच आपण अनुभवू शकतो. आनंद मिळवून जीवन जगण्यातच आपले मनःस्वास्थ्य टिकून राहू शकते. मानसिक स्वास्थ्य हे आपल्या भावनात्मक, कौटुंबिक आणि सामाजिक बाबींशी निगडीत असते. आपण कसा विचार करतो, अनुभवतो आणि कृती करतो ? यावर ते अवलंबून असते. अनेकदा नकळत आपल्या अंतर्मनावर ताण येत असतो, तो जाणवत नाही आणि म्हणूनच कळतही नाही. अशावेळी आपल्या क्रिया आणि प्रतिक्रिया अनावधानाने बदलत जातात. त्यामुळे घेतलेले निर्णय आणि त्या दरम्यान इतरांशी होणारे आपले संवाद काहीवेळा विपरीत परिणाम करणारे ठरू शकतात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अगदी बालपणापासून वृद्धापर्णापर्यंत मानसिक स्वास्थ्य महत्वाचे आहे. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असतो. त्यामुळे आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक ह्या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. आनंदाची गोडी अवीट असते, त्यामुळे आनंदप्राप्तीचा कधीच वीट येत नाही. आनंदाची प्राप्ती करण्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन, व्यवहाराची गरज असते. त्यायोगेच सकारात्मक वातावरणाची निर्मिती होऊ शकते. आनंदाची निर्मिती आपल्याच अंतरंगांत करावी लागत असते.



आधुनिक केसरी

**ज्ञानाई-तुकाई | भाग्य आम्हा ||**

मनोभावे गावु | विठोबाचे गान ||
आणिकाची जाण | नसे आम्हा ||१||
रातदिन भजू | विठोबाचे गुण ||
आणिक सद्गुण | काय आम्हा ||२||
कर्मात नांदते | विठाईची आन ||
सत्कर्माचे भान | नित्य आम्हा ||३||
भजनात रंगे | विठोबाची वारी ||
रामकृष्ण हरि | मंत्र आम्हा ||४||
लागलासे ठाव | विठोब्राच्या पायी ||
ज्ञानाई-तुकाई | मोक्ष आम्हा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

अपवित्रं पवित्रं च कृपया मङ्गलं भवेत्|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ७४ || जे अपवित्र असेल, ते तुझ्या कृपेने पवित्र आणि मंगल होवो. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

कामी चिन्तन काम का, ज्ञानी सुमिरन नाम ।
धेनु वत्स चिन्तन करे, त्यो सुमिरो सत्यनाम
।।१२।।(स्वर्वेद पंचम मण्डल षोडश अध्याय)
०५/१६/१२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ज्याप्रमाणे कामी व्यक्ती विषयांचे चिंतन करते, गाय वासराचे चिंतन करते त्याचप्रमाणे शब्दानुरागी संत सत्यनाम परमेश्वराची आंतरिक साधना , स्मरण करतात.

.............................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

# आत्मदर्शन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आत्मज्ञानाने मनुष्य समाधानी रहातो म्हणजे कितीही सुख असले तरी समाधानी नसणे हे तर वेडेपणाचे ठरेल. त्यासाठी समर्थांनी एक ऊदा, दिले आहे. विश्वाचा प्रलयकाळ आला म्हणजे माया नाहींशी होईल. माया नाश पावली की मग आम्हाला ब्रम्हज्ञान मिळेल. अशी खोटी आशा करण्यात काहीच अर्थ रहात नाही. मुळात देहाचा किंवा आत्मप्रौढीचा विचाराला जर जास्त महत्व देत आले व विहितकर्म नीट डोळसपणाने, समग्र बुध्दीने पार पाडले तर सारासार विचार करता येतो. हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे अज्ञानदशेत मायेचा पसारा भयंकर वाटतो. मनामध्ये भिती निर्माण होते. पण जेव्हा तुम्ही आत्मानात्मविचार केला की माया ही कल्पीत आहे. ती जशी दिसते तशी नाही याची खात्री होते. पण तुम्हाला आत्मज्ञान मिळाले की मायेचा धाक भिती रहात नाही. आपण गाढ झोपेत असताना भितीदायक स्वप्न पडले तर घाबरतो. पण झोपेतून जागे झाल्यावर ती भिती रहात नाही. माणूसही स्वतः कल्पना करतो,कल्पना करून घाबरतो.

# भगवंतावर अकारण प्रेम करावे

आधुनिक केसरी

खरोखर, जगात आणि लौकिकांत आपण अडाणी राहिलो तर काही वाईट नाही. भगवंताच्या मार्गामध्ये त्याचा फायदाच होईल. आपण अडाणी झाल्याशिवाय, म्हणजे आपली विद्या आणि मोठेपण विसरल्याशिवाय, परमार्थ साधत नाही. मुलगा गावाला जाताना ज्याप्रमाणे आई त्याला फराळाचे देते, त्याप्रमाणे परमात्मा आपल्याला ज्या परिस्थितीत जन्माला घालतो त्या परिस्थितीत राहण्यासाठी लागणारे समाधानही तो आपल्याला देत असतो. ते घ्यायची आपली लायकी मात्र पाहिजे. जिथे असमाधान फार, तिथे दुष्ट शक्तींना काम करायला वाव मिळतो. याच्या उलट, जिथे खरे समाधान आहे, तिथे चांगल्या शक्ति मदत करतात. आपण नामाला चिकटून राहिलो तर बाहेरची वाईट परिस्थिती बाधणार नाही. देहाचा मनाशी संबंध आहे, आणि मनाचा हृदयाशी संबंध आहे; म्हणून मन नेहमी अगदी समाधानात ठेवावे, म्हणजे प्रकृती चांगली राहून आयुष्य वाढेल. स्वार्थ सुटताना पहिल्या पहिल्याने मनुष्य व्यवहाराच्या चौकटीत बसणार नाही. जो येईल त्याला तो आपलाच म्हणेल. पण परमार्थ मुरला की तो व्यवहार बरोबर करून शिवाय निःस्वार्थी राहील. खरोखर, परमार्थ हे एक शस्त्र आहे; त्यामध्ये सुसूत्रपणा आहे. व्यवहार न सोडावा; पण विषयाकडे गुंतणारी आपली वृत्ती भगवंताच्या आड येते, म्हणून तिला भगवंताकडे गुंतवावे. भगवंताची खरी आवड उत्पन्न झाली पाहिजे. भगवंतावर अकारण प्रेम करणे याचे नाव परमार्थ. परमार्थाला डोके शांत पाहिजे. एका गृहस्थाला सगळीकडे रामाची मूर्ति दिसू लागली. झाले त्याला वाटले की देव आपल्याला भेटला. पण हे काही खरे भगवंताचे दर्शन नव्हे. तो सर्व ठिकाणी आहे अशी भावना झाली पाहिजे. परमार्थाची काळजी करू नये; ती काळजीच प्रगतीच्या आड येते. वय वाढू लागले की आपले सर्व अवयव जसे प्रमाणात आपोआप वाढतात, तसेच परमार्थाला लागणार्या गुणांचे आहे. आपण साधन करीत असताना, आपली प्रगती किती झाली हे सारखे पाहू नये व समजा, आपण आपल्या परसात एक झाड लावले, आणि ते किती वाढले हे पाहण्यासाठी रोज त्याच्या मुळ्या उपटून आपण जर पाहू लागलो, तर ते झाड वाढेल का अगदी तसेच परमार्थाच्या प्रगतीचे आहे.



मनुष्याला परमार्थ किती साधला हे त्याच्या बोलण्यावरून आणि दृष्टीवरून ओळखता येते.

**बोधवचन : परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही. तो निव्वळ स्वतःकरिता आहे.**

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

**हाच देवामध्ये आणि संतामध्ये फरक आहे. सत्पुरुषाचा अनुग्रह झाला म्हणजे त्या व्यक्तीच्या प्रापंचिक आणि पारमार्थिक बाबतीत त्या सत्पुरुषाचीच सत्ता असते. सरकारच्या हातात सर्व सत्ता असते, आणि राज्ययंत्र सुरळीत चालण्याकरिता एकेका खात्याकडे एकेक कामगिरी सोपविलेली असते. कायद्याला धरून जोपर्यंत ते खाते आपले काम करीत असते, तोपर्यंत सरकार त्यात ढवळाढवळ करीत नाही. फक्त क्वचित् प्रसंगी आणि विशेष कारणामुळेच, हस्तक्षेप करून सरकार आपल्या सत्तेचा उपयोग करते, आणि इच्छेप्रमाणे गोष्टी घडवून आणते. तोच नियम इथेही लागू आहे. प्रापंचिक बाबतीत 'प्रारब्ध' हे एक खाते आहे, त्याचा संबंध देहापुरताच असतो. प्रत्येकाच्या प्रारब्धानुसार त्याला बऱ्यावाईट गोष्टी भोगाव्या लागतत. सत्पुरुष होता होईल त्यांत ढवळाढवळ करीत नाही.** फक्त व्यक्तीच्या कल्याणाकरिताच जर जरूर असेल, तर सत्पुरुष त्यात ढवळाढवळ करील. पण परमार्थाच्या बाबतीत त्याची सर्व सत्ता असते.

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**द्वाविमौ पुरुषौ लोके शिरःशूलकरावुभा ।
गृहस्थश्व निरारम्भो यतिश्व सपरिग्रहः ॥**

**सरलार्थ - हे दोन पुरुष समाजात डोकेदुखी उत्पन्न करणारे ( ठरतात ). एक गृहस्थ आणि दुसरा म्हणजे बायकोला धरून राहणारा संन्यासी. स्पष्टीकरण : आळशी आणि निरुद्योगी गृहस्थ म्हणजे समाजाची डोकेदुखी असते, कारण असा गृहस्थ समाजाला भारभूत होतो. कारण त्याच्या निरुद्योगीपणाचा त्रास इतरांनाही सहन करावा लागतो. संन्यासी अकिंचन असला तर तो खरा संन्यासी धन- दौलत आणि उपभोगाची साधने निर्माण करून त्यातच लोळणारा हा बोकेसंन्यासी होय. हीही एक समाजाची डोकेदुखीच. कारण त्याच्या भोंदूगिरीला साधी भोळी माणसे बळी पडतात आणि शेवटी पस्तावतात.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २५ ऑगस्ट २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# मालेगाव तालुक्यातील चिवरा येथे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हलविण्यासाठी भाजप आमदाराने घातला घाट

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दामूआण्णा इंगोले यांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** जिल्ह्यात एखादे मोठे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व्हावे; अशी संपूर्ण जिल्हावासीयांची अनेक वर्षापासूनची मागणी होती. अखेर या मागणीला शासनाकडून मान्यता मिळाली असून, मालेगाव तालुक्यातील चिवरा येथे सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास मंजुरात मिळाली आहे. येथे ईऱक्लासची शासकीय जमीन उपलब्ध असल्यामुळे आपसुकच, महाविद्यालयासाठी लागणाऱ्या विस्तारित जागेचा गहन प्रश्न सुद्धा सुटला आहे. मात्र आपल्या प्लॉटिंगचे भाव वाढावे केवळ या हव्यासापोटी जिल्ह्यातील भाजपाच्या आमदाराने वैद्यकीय महाविद्यालय चिवरा येथून इतरत्र हलविण्याचा घाट घातला आहे. असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते दामूअण्णा इंगोले यांनी केला आहे. केंद्रात आणि राज्यात सुद्धा भाजपाची सत्ता असल्यामुळे हा कुटील डाव साध्य करण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील स्वाभिमानी संघटनेच्या वतीने इंगोले यांनी दिला आहे.



२८ जून रोजीच्या बैठकीत राज्य मंत्रिमंडळाने जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयासोबतच ४३० खाटांचे सर्व सोईसुविधायुक्त रुग्णालय उभारण्याचा सुद्धा निर्णय घेतला होता. येथील ७७ एकर ईऱ क्लास जमिनीवर सदर महाविद्यालय सुरू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. आणि त्यासाठी ४८५ कोटींचा निधी खर्च करण्याची घोषणा करून शिक्कामोर्तब सुद्धा करण्यात आले होते. परंतु, या सर्व घडामोडीनंतर जिल्हा प्रशासनाने महाविद्यालयासाठी पर्यायी चार जागांचे प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यामुळे, खऱ्या अर्थाने येथूनच संभ्रम निर्माण होण्यास सुरुवात झाली. आणि मानोरा तालुक्यातील काही संघटनांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मानोरा तालुक्यात देण्याच्या मागणीवर जोर दिला. या मागणीला जिल्ह्यातील एका राजकीय पुढाऱ्याने छुपा पाठिंबा देत चिवरा येथील प्रस्तावित महाविद्यालयाच्या कामात खोडा घालण्याचा प्रयत्न केल्यामुळे सदर प्रकरण तापत चालले आहे. हे विशेष..!

मालेगाव तालुक्यातील चिवरा येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय झाल्यानंतर, केवळ आपल्या प्लॉटिंगचे भाव वाढावे या वैयक्तिक लाभासाठी जिल्ह्यातील भाजप आमदार हा कुटील डाव जाणीवपूर्वक खेळत असल्याचा आरोप दामूअण्णा इंगोले यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले, रिसोड, मालेगाव या दोन तालुक्याच्या केंद्रस्थानी चिवरा गाव असून, अनेक बाबतीत हे दोन तालुके आजही पिछाडीवर आहेत. शासकीय महाविद्यालय येथेच सुरू झाल्यास जिल्ह्यातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांना निश्चितच याचा मोठा लाभ मिळणार आहे. शिवाय शेकडो खाटांचे सोईसुविधायुक्त रुग्णालय सुरू करण्याचा निर्णय सुद्धा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना देखील खूप मोठा दिलासा मिळणार आहे. परंतु, केवळ आपल्या भूखंडाच्या आसपास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय झाल्यास प्लॉटिंगला खूप किंमत येणार उद्देशाने हा घाट घातल्या जात आहे. सत्तेच्या मस्तीतून हा कुटिल डाव खेळला जात असला, तरी आम्ही कशाचीही पर्वा,तमा न बाळगता थेट मंत्र्याच्या दारात सुद्धा जाऊ..! पण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय इतरत्र हलवू देणार नाही असा इशारा देखील स्वाभिमानीचे नेते दामूअण्णा इंगोले यांनी दिला आहे.

# ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांना रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालयात काव्यमय आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ज्येष्ठ निसर्ग कवी ना.धों. महानोर यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या अशा अचानक जाण्याने कार्यक्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ना. धों. महानोर यांच्या कार्यक्षेत्रातील उल्लेखनीय अशा दीर्घकालीन वाटचालींना उजाळा द्यावा व विद्यार्थ्यांना त्यांच्या साहित्य व काव्य क्षेत्रातील योगदान कळावे म्हणून छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित रामकृष्ण वाघ कला व वाणिज्य महाविद्यालय आणि सरस्वती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जेष्ठ कवी ना. धो.महानोर यांना काव्यमय आदरांजली देण्याचा कार्यक्रम महाविद्यालयातील मराठी विभागाद्वारे आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती, ज्येष्ठ निसर्ग कवी ना.धो. महानोर आणि बालकवी यांच्या प्रतिमेला वंदन करून व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. याप्रसंगी संगीत विभाग प्रा. देशमुख आणि प्रा. रोठे यांच्याद्वारे मान्यवरांचे शब्द सुमनांनी स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव मा.प्राचार्य डॉ. मारोती वाघ तसेच प्रमुख मार्गदर्शक संस्थेच्या संचालिका सौ. लता वाघ , प्रमुख पाहुणे म्हणून श्री. लेमदेव पाटील महाविद्यालय मांढळ येथील प्रा. डॉ.तीर्थराज कापगाते पर्यवेक्षिका प्रा. कांचन तिवारी, प्रभारी प्राचार्यश्री. पंकज झगडे, मराठी विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे - पिदळी , प्रा. आरती कडू आदी मान्यवर उपस्थित होते. पळसखेड सारखे जन्मगाव , लहानपणी कानावर पडणारी लोकगीते , अजिंठा सारखा अद्भुत वास्तुपरिसरातील वावर, माथ्यावर आणि भवती सदैव खुला निसर्ग ,शेतीच्या निमित्ताने भुईशी जडलेले नाते आणि तरल संवेदनशील भाववृत्ती यातून महानोर यांच्या ओंजळीत निसर्गाचे चेतनातत्व अलगद पडले. त्यांनी शब्दाची ओवणी करीत त्याचे सोने केले. अस वक्तव्य डॉ. तीर्थराज कापगाते यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना व्यक्त केले. तर, ना.धो. महानोर हे मराठीतील श्रेष्ठ निसर्ग कवी होते मानवी भावना निसर्गातून व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्या शब्दांमध्ये होते निसर्ग हाच मूलभाव त्याच्या त्यांच्या कवितांमधून जाणवतो त्यांच्या साहित्यकृतीने मराठी साहित्यात अमिट असा ठसा उमटवला.असे भाष्य संस्थेच्या संचालिका वाघ मॅडम यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले. ना. धो. महानोर यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात यावा यास्तव या प्रसंगी विद्यार्थ्यांनी ना.धों. महानोर यांच्या कवितांचे अभिवाचन करीत आदरांजली अर्पित केली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या माध्यमातून मराठी अभ्यास मंडळाची ( उन्मेष) ची स्थापना करण्यात आली.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक्षा बोपचे (बी. ए तृतीय वर्ष), प्रास्ताविक प्रा. सायली लाखे - पिदळी यांनी केले आणि मराठी अभ्यास मंडळाची घोषणा प्रा. रोमा दुर्गे मॅडम यांनी केली.तर आभार दिक्षा माने बी. ए (द्वितीय वर्ष) हीने मानले .

कार्यक्रमाला शिक्षक वृंद आणि प्राध्यापक वृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या प्रचंड उत्साहात आणि उत्स्फूर्तपणे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# आता वर्षातून दोनदा बोर्ड परीक्षा होणार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** शिक्षण मंत्रालयाने शालेय शिक्षणामध्ये महत्त्वाचे बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत नवीन राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (एनसीएफ) तयार करण्यात आला आहे. या नवीन आराखड्यानुसार, बोर्डाच्या परीक्षा वर्षातून दोनदा घेतल्या जातील. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे सर्वोत्तम गुण मिळवण्याची संधी मिळेल. वर्षातून एकदाच बोर्डाची परीक्षा घेतल्याने विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा ताण येतो, हा ताण कमी करण्यासाठी हे धोरणात्मक पाऊल उचलल्याचे शिक्षण मंत्रालयाकडून सांगण्यात आले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी बुधवारी जाहीर केले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, नवीन अभ्यासक्रम आराखडा तयार केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४ साठी पाठ्यपुस्तकेही विकसित केली जात आहेत, असेही त्यांनी सांगितले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना दोन भाषांचा अभ्यास करावा लागेल. यातील एक भारतीय भाषा असेल. हा निर्णय केवळ भाषिक विविधता आणण्यासाठी नव्हे तर देशाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी घेतला आहे, असं नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्कमध्ये म्हटले आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेत चांगली कामगिरी करता यावी. त्यासाठी पुरेसा वेळ आणि संधी मिळावी, या हेतुने वर्षातून किमान दोनदा बोर्ड परीक्षा घेतल्या जातील. ज्या विषयांचा अभ्यास पूर्ण झाला आहे आणि ते परीक्षेसाठी तयार आहेत, असं जेव्हा विद्यार्थ्यांना वाटेल. तेव्हा त्याच विषयांच्या परीक्षेसाठी विद्यार्थी बोर्डाच्या परीक्षेला बसू शकतील, असेही नवीन अभ्यासक्रम आराखड्यात म्हटले आहे.

# पैठण तालुक्यातील आपेगाव तापेच्या आजाराने फणफणले

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील आपेगाव येथे डेंग्यू सदृश आजाराने एका अल्पवयीन मुलीचा मृत्यू झाल्याने गावात एकच खळबळ उडाली आहे.
आपेगावात गावात मोठ्या प्रमाणात हिवतापेचे रुग्ण आढळून येते असल्याने जिल्हा व तालुका आरोग्य यंत्रणा आपेगावात दाखल झाली आहेत. वेदिका विजय गडकर वय वर्ष 14 ही आपेगाव येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात इयत्ता नववी वर्गात शिकत आहे. नेहमीप्रमाणे बुधवारी दुपारी शाळेत गेली. शाळेतुन घरी परत आल्यानंतर तीला अचानक ताप आली आणि तिला अस्वस्थ वाटु लागल्याने तीला पैठण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र रात्री तिचे निधन झाले. गावातील एक अल्पवयीन युवक आनेक रुग्ण तापेच्या आजारांवर पैठण येथील खासगी रुग्णालयात उपचार घेत आहे. त्याच्या रक्ताची तपासणी केली असता त्यांना डेंग्यू झाल्याचे निष्पन्न झाल्याने गावकऱ्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. मयत झालेल्या मुलीला डेंग्यू झाला असवा त्यामुळे तिचा मुत्यू झाला असावा असा गावकऱ्यांचा समज आहे. सध्या गावात शंभरच्या आसपास ग्रामस्थ तापेने फणफणले असून पैठणशहर, आपेगाव, नवगाव, येथील वेगवेगळ्या ठिकाणी खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे. गावचे टसरपंच पांडुरंग औटे यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली. या माहितीवरुन पैठण तालुका आरोग्य यंत्रणा गावात दाखल झाली असून घरोघरी जाऊन रुग्नाची माहिती व रक्ताचे नमुने घेतले जात आहे. संभाजीनगर जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रविंद्र ढोले, तालुका अधिकारी सय्यद अजहर, यांनी गावाला भेट देऊन आरोग्य पथकाला सुचना दिल्या. विहामांडवा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक दाभाडे, आरोग्य निरीक्षक महेंद्र शाक्य, बापुराव शेंडगे, शरद गोरे, सुनिता गोरे, एकनाथ धुमाळ, सिध्दार्थ वाव्हुळे, यांनी घरोघरी जाऊन तपासणी केली.



# मविआची बैठक

आधुनिक केसरी

दक्षिण आफ्रिकेमधील जोहान्सबर्ग येथे 15 व्या ब्रिक्स शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेसाठी अनेक देशांचे प्रतिनिधी दक्षिण आफ्रिकेमध्ये पोहचले आहेत. तसेच या परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग हे देखील जोहान्सबर्गमध्ये दाखल झाले आहेत. याच परिषदेदरम्यान चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एकमेकांच्या समोर आले. ब्रिक्समध्ये ब्राझील, रशिया, चीन, भारत आणि दक्षिण आफ्रिका या देशांचा समावेश आहे. जेव्हा ब्रिक्सचे कुटुंब म्हणून पाचही देशांचे प्रतिनिधी फोटोसाठी मंचावर गेले. त्यावेळी पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रपती जिनपिंग हे देखील मंचावर उपस्थित होते. त्यामुळे सगळ्यांच्या नजरा या दोन देशांच्या प्रतिनिधींकडे लागल्या होत्या. यावेळी ब्राझीलचे राष्ट्रपती लुइज इनासियो लुला दा सिल्वा, चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग, दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपती सिरिल रामफोसा आणि रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव देखील उपस्थित होते. ब्रिक्समधील पाचही देशांचे प्रतिनिधी जेव्हा मंचावर आले तेव्हा पंतप्रधान मोदी देखील त्यांच्यासोबत होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अगदी सहज स्मितहास्य करताना पाहायला मिळाले. तर चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग हे थोडेफार अस्वस्थ वाटले. तर जेव्हा हे दोघेही समोर आले तेव्हा त्यांनी एकमेकांना पाहून स्मितहास्य केले. यंदाचे ब्रिक्स परिषदेचे यजमानपद हे दक्षिण आफ्रिकेकडे आहे. यावेळी संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी अंतराळातील सहयोगाबद्दल देखील भाष्य केले आहे. तर यावेळी भारताच्या चांद्रयान मोहिमेचे देखील या सर्वांना कौतुक केले आहे आणि भारताला शुभेच्छा दिल्या आहेत. भारताच्या चांद्रयानाने जेव्हा चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडींग केले तेव्हा पंतप्रधान मोदी हे दक्षिण आफ्रिकेमधील जोहान्सबर्ग येथे होते. त्यांनी तिथूनच इस्रोच्या शास्त्रज्ञांचे कौतुक केले. तसेच जोहान्सबर्गमध्ये उपस्थित असलेल्या इतर देशांच्या प्रतिनिधींनी पंतप्रधान मोदींचे अभिनंदन केले. आम्ही देखील भारताच्या आनंदात सहभागी आहोत असे दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रपती सिरिल रामफोसा यांनी म्हटलं आहे. या ब्रिक्स परिषदेमध्ये इतर देशाचे देखील प्रतिनीधी उपस्थित होते. तर या ब्रिक्सच्या परिषदेमध्ये एकूण 40 देशांनी सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. यामध्ये संयुक्त अरब अमिरात, इराण, सौदी अरेबिया, इंडोनेशिया या देशांचा समावेश आहे. त्यामुळे या ब्रिक्सच्या परिषदेकडे देशाचे लक्ष लागून राहिले आहे.

# महाराष्ट्राचा एक विकासाच्या प्रतीक्षेतील जिल्हा!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**माझ्या गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी बांधवांची विशिष्ट व पावन अशी संस्कृती आहे. त्यांचे पेरसा पेन हे दैवत आहे. ते शुभ कार्याप्रसंगी किवा पिकांचे उत्पादन झाल्यावर रेला नृत्य करून आनंद व्यक्त करतात. ढोल हे सुद्धा त्यांचे आवडीचे वाद्य आहे. होळी, पोळा, दसरा व दिवाळी हे त्यांचे मुख्य सण आहेत. आदिवासी जमात ही मुख्यतः जिल्ह्याच्या घनदाट जंगलात वास्तव्य करून आहे. जिल्ह्यातील इतर जातीतील लोक त्यांचे पोळा, गणपती, दसरा, दिवाळी, होळी, ईद, नाताळ, बुद्धपौर्णिमा इत्यादी सण गुण्यागोविंदाने साजरे करतात. जिल्ह्याच्या काही भागात झाडीपट्टीतील प्रसिद्ध दंडार, नाटक, तमाशा, सोंग, कव्वाली, इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यांचे दिवाळी ते होळी या कालावधीत विविध भागात आयोजन केले जाते.**

यामुळे झाडीपट्टी नाटकासाठी वडसा हे तालुक्याचे ठिकाण प्रसिद्ध आहे. गणपती, दसरा, होळी आदी सणांचे वेळी तसेच शंकरपट, मंडई, जत्रा, गळ यांच्या निमित्ताने आयोजन होते.

गडचिरोली जिल्हा हा दि.२६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्यापासून वेगळा करण्यात आला. तेव्हा हा महाराष्ट्राचा ३१वा जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. गडचिरोली व सिरोंचा हे चंद्रपूर जिल्ह्यामधील तालुके होते. गडचिरोली जिल्हा महाराष्ट्र राज्यात ईशान्य दिशेला असून तेलंगणा व छत्तीसगड राज्यांच्या सीमेलगत आहे. हा जिल्हा नक्षलग्रस्त म्हणून सर्वश्रुत आहे. जिल्हा जवळपास ७६ टक्के घनदाट जंगलाने व्यापलेला असल्याने त्यांत नक्षलसमर्थक आश्रय घेतात. जिल्ह्याचे क्षेत्रफळ १४,४१२ चौकिमी आहे. हा जिल्हा नागपूर विदर्भ प्रदेशात मोडतो. जिल्ह्याचे मुख्यालय गडचिरोली येथे आहे. त्यातील तालुके अहेरी, आरमोरी, एटापल्ली, कुरखेडा, कोरची, गडचिरोली, चामोर्शी, देसाईगंज- वडसा, धानोरा, भामरागड, मुलचेरा, सिरोंचा असे एकूण १२ आहेत. महाराष्ट्रात गडचिरोली जिल्ह्याचे स्थान हे राज्याची राजधानी मुंबईच्या विरुद्ध दिशेला शेवटच्या टोकावर आहे.

जिल्ह्यात अनुसूचित जातीच्या लोकांची संख्या १,०८,८२४ एवढी असून तिची एकूण टक्केवारी ११.२ होते. आदिवासी जमातींच्या लोकांची संख्या ३,७१,६९६ एवढी असून त्यांचे प्रमाण जिल्ह्यात जास्त आहे. त्यांची टक्केवारी ३८.३० एवढी आहे. येथे बहुजन समाजही येथील आदिम संस्कृतीशी एकरुप झालेला आढळतो. जिल्ह्यात एकूण लोकसंख्येपैकी ३८ टक्के लोकसंख्या ही अनुसूचित जमातीची असल्याने हा जिल्हा महाराष्ट्रातला आदिवासीबहुल जिल्हा समजला जातो. अनुसूचित जमातीमध्ये मुख्यत्वे गोंड, हलबा, कोलाम, माडिया, बडा माडिया, परधान इत्यादी जमातीचे लोक आहेत. त्यांच्या बोलीभाषा गोंडी, माडिया, हलबी आदी आहेत. गडचिरोली जिल्ह्यामध्ये यांशिवाय मराठी, हिंदी, तेलुगू, बंगाली व छत्तीसगडी इत्यादी भाषा बोलल्या जातात. फार प्राचीन काळी या प्रदेशावर राष्ट्रकूटांचे राज्य होते. त्यानंतर चालुक्य वंशाचे व नंतर देवगिरीच्या यादवांचे राज्य आले. यानंतर गडचिरोलीवर गोंड राजांनी राज्य केले. तेराव्या शतकात, खंडक्या बल्लाळशाह यांनी चंद्रपूरची स्थापना केली. त्यांनी आपली राजधानी सिरपूर येथून चंद्रपूर येथे हलविली. याच काळात चंद्रपूर प्रदेश हा मराठ्याच्या सत्तेखाली आला. सन १८५३मध्ये बेरार हा चंद्रपूर- पूर्वीचा चांदा प्रदेशाचा भाग ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आला. सन १८५४मध्ये चंद्रपूर हा बेरार या प्रदेशामधला स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. ब्रिटिशांनी सन १९०५मध्ये चंद्रपूर व ब्रह्मपुरी यांतील जमीनदारी व मालमत्ता हस्तांतरण करून गडचिरोली तालुक्याची निर्मिती केली होती. राज्याची पुनर्रचना होण्यापूर्वी हा भाग सन १९५६पर्यंत केंद्रीय अधिपत्याखाली होता. त्यानंतर राज्य पुनर्रचनेनुसार चंद्रपूर बॉम्बे स्टेटमध्ये समाविष्ट करण्यात आले. सन १९६०मध्ये महाराष्ट्र राज्य निर्माण झाले, त्यांत चंद्रपूर हा जिल्हा समाविष्ट झाला. दि.२६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून स्वतंत्र गडचिरोली जिल्हा हा भारताचा ५५६वा जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. वैनगंगा नदीला सीमारेषा मानून चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करण्यात आले.




जिल्ह्यात दोन नगरपालिका असून त्या गडचिरोली व वडसा येथे आहेत. येथील महाविद्यालये ही गोंडवाना विद्यापीठाच्या अंतर्गत येतात. शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली व गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेज, गडचिरोली हे येथील वैभव समजले जाते. या जिल्ह्यात गोंडवाना सैनिकी विद्यालय नावाचे एक लष्करी शिक्षण विद्यालय आहे. प्रेक्षणीय स्थळे मार्कंडा, चपराळा, आलापल्ली, वैरागड. हेमलकसा व कामलापूर ही आहेत. येथील चामोर्शी तालुक्यातील मार्कंडादेव हे मार्कंडेश्वराचे ऐतिहासिक शिवमंदिर व चप्राळा येथील हनुमान मंदिर प्रसिद्ध आहेत. तर कुरखेडा तालुक्यातील मालेवाडा येथून १० किमी अंतरावर खोब्रामेंढा देवस्थान असून तेथे खुप मोठी मारुतीची मूर्ती आहे. या तिन्ही ठिकाणी महाशिवरात्रीला खुप मोठी यात्रा भरते. मार्कंडा देवस्थानास विदर्भाची काशी म्हणून ओळखले जाते. सुप्रसिद्ध डॉ.अभय बंग व त्यांची पत्नी राणी बंग यांचे सर्च- शोधग्राम, गडचिरोली ही संस्था तेथील आदिवासी बांधवांना आरोग्यसेवा पुरवते. तर डॉ.प्रकाश आमटे यांची लोक-बिरादरी हेमलकसा व भामरागड ही संस्थादेखील आदिवासी बांधवांना सामाजिक व आरोग्यविषयक मदत करते. हा जिल्हा बांबूची झाडे व तेंदूपानांकरिता प्रसिद्ध आहे. धान- भात हे जिल्ह्याचे मुख्य पीक आहे. याव्यतिरिक्त तूर, गहू, ज्वारी, सोयाबीन, जवस, उडिद, मूग, भुईमूग, भाजीपाला, इत्यादी कृषी उत्पादने घेतली जातात. जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा मोसमी पावसावर अवलंबून आहे. जिल्ह्यात चामोर्शी तालुक्यामध्ये आष्टी येथे पेपर मिलचा कारखाना असून इतर कोणतेही मोठे उद्योगधंदे नाहीत. सुशिक्षित तरुणवर्गास गाईगुरे व शेळ्या राखण्याशिवाय पर्याय नाही. बेरोजगारीने त्याच्या मनात न्यूनगंड निर्माण होत आहे.

यामुळे जिल्हा हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. जिल्ह्यात भाताचे उत्पादन जास्त होत असल्याने भात गिरण्यांची संख्या जास्त आहे.

भातसडीचे उद्योग व कागद कारखाने जिल्ह्यात आहेत, मात्र मोठे उद्योग नाहीत, विकास नाही. जिल्ह्यात कोसाचे उत्पादन होत असून कोसा उत्पादन केंद्र आरमोरी येथे आहे. जिल्ह्याच्या नशिबी फक्त १८.५ किमी लांबीचा रेल्वे मार्ग असून देसाईगंज येथेच ब्रिटिश कालीन रेल्वेचे छोटेखानी स्टेशन आहे. जिल्हाला एकच मोठी बाजारपेठ आहे, ती वडसा- देसाईगंज येथे भरते. वडसा हे शहर वैनगंगा नदीच्या काठावर वसलेले असून जिल्ह्यातील एकमेव रेल्वे लाईन गोंदिया-नागभीड-चंद्रपूर येथून जाते. त्यामुळे येथे मोठी बाजारपेठ आहे. गडचिरोली जिल्हा मुख्यालय फक्त नाममात्र आहे. येथील लोकप्रतिनिधी स्वार्थ अधिक साधतात; तर माझ्या जिल्ह्याच्या विकासाकडे दुर्लक्षच करतात, हे येथे विशेष उल्लेखनीय!

# जीवन हा यश अपयशाचा खेळ



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवन हा यश अपयशाचा खेळ असतो. अपयशाला नकारात्मक घेऊन त्याचे खापर कशावर तरी फोडून स्वतः ला निर्दोष सिद्ध करण्याला फार काही अर्थ नसतो . आपण कुठे चुकलो कुठे कमी पडलो आपली रणनीती आखण्यात कुठे चुक झाली हा शोध महत्वाचा असतो.आपल्या चुकांचा शोध घेऊन पहिल्या पेक्षा अधिक वेगाने कार्य करण कधीही उत्तमच असतं. मनाविरुद्ध घडण म्हणजे आपण अपयश समजतो. पण साधारणतः अपयश हे दोन प्रकारचे असते.**

एक सार्वजनिक क्षेत्रातील अपयश त्या मध्ये सामाजिक , उद्योग, व्यवसाय, राजकारण, समाजकारण, इत्यादी क्षेत्रांचा समावेश असतो. तर दुसरा प्रकार म्हणजे व्यक्तिगत अपयश हे म्हणजे कौटुंबिक ,नाते संबंध , शैक्षणिक, नौकरी, अशा पद्धतीने जीवनात साधारणपणे आपल्याला दोन प्रकारच्या यश अपयशाला सामोरे जावे लागत असत. उपरोक्त नमुद प्रकारातील वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने प्रत्येक जण यशा साठी प्रयत्न करत असतो. आणि त्यासाठी मार्गस्थ होऊन प्रगतीच सर्वोच्च शिखर गाठण्यासाठी प्रयत्न करत असताना याच दरम्यान कधी कधी पुढे जाण्याऐवजी थांबावं लागतं. किंवा दोन पावलं मागे यावं लागतं .यालाच आपण अपयश म्हणतो संबोधतो . थांबण म्हणजे संपण नव्हे . अपयशाच्या संदर्भात प्रत्येकाचं वेगळं मत असु शकत .वेगळं निरीक्षण असणं यामध्ये काही गैर नाही. जीवनातील कुठलंही अपयश हे अंतिम नसतं .अपयश आल म्हणून खचणे निराश होणे, खिन्न होणे, तणाव घेणं हा पुरूषार्थ नाही .यश अपयश हे जीवनातील अविभाज्य घटक आहेत. आपल्याला निरंतर किंवा सतत यश मिळेल. असं कधी होत नाही . आणि सतत अपयश येईल असही होत नाही .यश अपयशाचा लपंडाव म्हणजे जीवन .आणि हा लपंडाव ज्याला निःसंदिग्ध पणे खेळता येईल. तो जीवनाच्या पटलावरील आति उत्कृष्ट खेळाडू आहे. असं समजायला काहीच हरकत नाही. यश मिळाल्या नंतर हुराळुन जाता कामा नये. व अपयश आलं म्हणून खचुन जाता कामा नये.यश मिळवत असताना यदाकदाचित अपयश आलं तर त्या अपयशाचे खापर हे कोणावरही न फोडता. आत्म चिंतन करून आपण कुठे कमी पडलो याचा शोध घेतला पाहिजे .आणि आपले प्रयत्न अधिक गतीने वाढवले पाहिजेत पण शक्यतो आपण तसं न करता अपयशाची वास्तविक नसलेली वेगवेगळी कारणं शोधुन काढतो व आपली सहीसलामत सुटका करून घेण्याचा प्रयत्न करून आपलं व आपल्या हिंतचिंतकांच खोटं समाधान करतो . बहुतांश लोकांच्या संदर्भात अपयशाची कारणमिमांसा एवढाची आहे कि आपल्या अपयशाचे खापर हे .खरंया अर्थाने कोणाच्या तरी माथी मारून मोकळं होणं . पण असं करणं खरंच उचित ठरेल का ? तर नक्कीच नाही .आणि म्हणूनच अपयशाच योग्य असं चिंतन मंथन करून वास्तविक कारणमिमांसा शोधून पुन्हा नव्याने कामाला सुरुवात करणं म्हणजे उत्तम व्यक्तिमत्त्वाच लक्षण आहे . म्हणून अपयश हे व्यक्तिगत असो किंवा सार्वजनिक क्षेत्रातील असो आपण जेव्हा अपयशाला सामोरे जातो तेव्हा मात्र बहुतांश लोक हे त्याच आत्मपरीक्षण करून स्वतः मध्ये सुधारणा करण्याऐवजी अपयशाचा वारसदार शोधून स्वतः नमनिराळे राहण्याचा प्रयत्न करून स्वतःच नुकसान करून घेतात सध्या असंच सकृतदर्श चित्र सगळ्याच क्षेत्रात पाहायला मिळत आहे. पण असं करत असताना यामध्ये इतरांच कहीच जात नाही.किंवा इतरांच कहिही नुकसान होत नाही.उलट आपणच आपल्या स्वतःचे खूप मोठं नुकसान करून घेतो असतो. मुळात अपयश ही काही फार मोठी गोष्ट नाही. तर ती यशाची पहिली पायरी आहे. पहिली पायरी चढल्याशिवया शेवटीची पायरी येणार नाहीच मग पहिली पायरी चढताना एवढं काय घाबरायचे आणि कधी कधी अस पण होत कि अनेक लोक थेट पहिल्या प्रयत्नात यशस्वी होतात. म्हणजेच अपयशाची त्यांची भेट होत नाही. मात्र बहुतांश लोक हे पहिल्या प्रयत्नात यशस्वी होत नाहीत. तर काही लोकांना अपयशाच्या अनेक पायर्या ओलांडून यशाला गवसणी घालावी लागते. कधी कधी जीवनात दोन पाऊल पुढे जाताना दोन पावलं मागे पण याव लागत हे नैसर्गिक आहे. याला कोणीही अपवाद नसतं .परंतु अपयश जेव्हा पदरी पडत तेव्हा आपण आपलं ज्ञान विवेक आणि संयम हरपतो आणि भावनिक होऊन नकारात्मक दृष्टिकोन अंगिकरतो. नकारात्मक दृष्टिकोन हा प्रामुख्याने ज्ञानावर अघात करतो आणि मग आपण मुख्य जो मुद्दा आहे कि अपयशाचे आत्मपरीक्षण करून अधिक जोमाने शक्तिने कार्य , मेहनत करून यश खेचून आणण्यासाठी प्रयत्न करण तोच विसरतो .जे क्रमप्राप्त असत ते आपण करत नाही.उलटं पक्षी आपण अपयशाला विविध कारणांशी जोडुन खेळत बसतो. आणि टाईमपास करतो. प्रचंड वेळ वाया घालवतो आणि हि वाया घातलेली वेळ आपल्यला खुप मागे घेऊन जाते.आणि कधी कधी तर इतकं मागे घेऊन जाते कि पुन्हा आपण प्रयत्न करणच सोडुन देतो. म्हणजे तिथे हा अध्याय संपुष्टात येतो . आणि आयुष्य भर आपण हिच कथा वाचतो की या कारणांमुळे आपण यशस्वी होऊ शकलो नाही. असंच काहीसं भासवून स्वतः ला मात्र या मधुन आपण सहिसलामत बाजूला काढतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# चार बांगलादेशी घुसखोरांना 'एटीएस'कडून अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नगर :** दलालामार्फत बनावट कागदपत्रे तयार करून भारतात घुसखोरी करणाऱ्या चौघा बांगलादेशी नागरिकांना नाशिक व नगरच्या दहशतवाद विरोधी पथकाने नगर शहराजवळ अटक केली. या चौघांसह त्यांच्या वास्तव्यासाठी बनावट मतदान ओळखपत्र, पारपत्र, आधार कार्ड, जन्माचे दाखले, बँक पासबूक आदी कागदपत्रे तयार करून देणाऱ्या पश्चिम बंगाल व बांगलादेशातील १० जणांनी विरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मो. मोहीउद्दीन नाझीम शेख (३६), शहाबुद्दीन जहांगीर खान (२७), दिलावरखान सिराजउल्ला खान (२७) व शहापरान जहांगीर खान (२०, सर्व रा. सध्या शिवशक्ती स्टोन क्रशर, खंडाळा, नगर. मुळा रा. बांगलादेश) या चौघांना अटक करण्यात आली आहे. या चौघांसह त्यांना मदत करणारे बांगलादेशातील दलाल व बनावट कागदपत्रे तयार करून देणारे रासल एजाज शेख, सोहेल, माणिक खान, नोमान, अब्दुल कादर (सर्व रा. बांगलादेश, पूर्ण नाव, पत्ते नाहीत), कोबीर मंडल (उत्तर २४ परगाना, पश्चिम बंगाल, पूर्ण नाव पत्ते नाहीत) अशी आरोपींची नावे आहेत. यासंदर्भात नाशिक एटीएस पथकाचे सहाय्यक निरीक्षक प्रताप गिरी यांनी फिर्याद दिली आहे. बनावट कागदपत्रे त्यांनी मुंबई, कल्याण व सुरतमध्ये (गुजरात) तेथील स्थानिक पत्ते देऊन तयार केल्याचे एटीएसच्या तपासात निष्पन्न झाले आहे. बनावट कागदपत्रेही त्यांनी एजंटमार्फत पैसे देऊन तयार केली. या चौघांपैकी मो. मोहीउद्दीन शेख याला साधारण १० ते ११ वर्षांपूर्वी त्याच्या ओळखीचा रासल एजाज शेख याने बांगलादेशातून हसनाबादमार्गे पायी पश्चिम बंगाल येथे अवैधमार्गे नेले. तेथून रेल्वेने कल्याण येथे आणले. तेव्हापासून तो भारतात अवैधरित्या राहत आहे. मागील ७ ते ८ वर्षापासून तो खंडाळा (नगर) येथे आहे. शेख याने रासल या दलालाला भारतात प्रवेश करण्यासाठी १० हजार रुपये दिले. शहाबुद्दीन जहाँगीर खान याला सोहेल (रा. नोहाखेरी, बांगलादेश) याने ६ ते ७ वर्षापूर्वी बांगलादेश येथून आगरतळा येथे अवैधरित्या आणले. तेथून कोलकाता व नंतर कल्याण येथे आणले होते. त्याबदल्यात सोहेल याला १७ हजार रुपये खान याने दिले. तेव्हापासून तो भारतामध्ये राहत आहे. मागील ८ महिन्यापासून तो खंडाळा येथे राहत आहे. शहाबुद्दीन जहाँगीर खान याला सोहेल (रा. नोहाखेरी, बांगलादेश) याने ६ ते ७ वर्षापूर्वी बांगलादेश येथून आगरतळा येथे अवैधरित्या आणले. तेथून कोलकाता व नंतर कल्याण येथे आणले होते. त्याबदल्यात सोहेल याला १७ हजार रुपये खान याने दिले. तेव्हापासून तो भारतामध्ये राहत आहे. मागील ८ महिन्यापासून तो खंडाळा येथे राहत आहे.

# ज्येष्ठ अभिनेत्री सीमा देव यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीतली सोज्ज्वळ अभिनेत्री अशी ओळख असलेल्या अभिनेत्री सीमा देव यांचे आज सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. वयाच्या ८१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सीमा देव यांचा मुलगा अभिनय देव यांच्या घरीच सीमा देव यांचे निधन झाले. दिवंगत अभिनेते रमेश देव यांच्या त्या पत्नी होत्या. तसेच विविध चित्रपटांमध्ये त्यांनी आपल्या अभिनयाचा खास ठसा उमटवला होता. सीमा देव यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी पाच वाजता शिवाजी पार्क स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

'आनंद' या सिनेमात त्यांनी केलेली भूमिका आजही लोकांच्या स्मरणात आहे. २०२० मध्ये त्यांना अल्झायमर्स या आजाराने ग्रासले होते. अभिनेते अजिंक्य देव यांनीच ट्वीट करुन ही माहिती दिली होती. रमेश देव आणि सीमा देव या दोघांकडेही सिनेसृष्टी अत्यंत आदरपूर्वक पाहात होती. सीमा देव या मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील जेष्ठ अभिनेत्री होत्या. त्यांनी आतापर्यंत ८० पेक्षा जास्त मराठी आणि हिंदी चित्रपटांत काम केले. काही काळानंतर त्यांनी हिंदी चित्रपटांत काम करणे बंद करून केवळ मराठी चित्रपटांत काम करायला सुरुवात केली होती. आपल्या बहारदार अभिनयाने त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत एक वेगळाच ठसा उमटवला. सीमा देव यांचा जन्म मुंबईतील गिरगाव येथे झाला. पुढे त्यांचा विवाह अभिनेते रमेश देव यांच्याशी झाला. अभिनेते अजिंक्य देव आणि दिग्दर्शक अभिनय देव ही त्यांची दोन मुले आहेत. २०१३ मध्ये रमेश देव आणि सीमा देव यांनी लग्नाचा पन्नासावा वाढदिवस साजरा केला होता. सीमा देव यांचे मूळ नाव नलिनी सराफ असे होते. 'आलिया भोगासी' या सिनेमातून त्यांनी १९५७ मध्ये सिनेसृष्टीत पदार्पण केले होते. त्यानंतर त्यांनी पुढे अनेक हिंदी आणि मराठी सिनेमांमधून काम केले. आज अल्झायमर्स या आजाराने त्यांचे मुंबईतल्या जुहूमधल्या घरी निधन झाले.

# आद्य गौड बहु मंडलचा हरियाली सावन तीज महोत्सव उत्साहात




आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** येथील सावन हरियाली तीज सणाचे अवचित साधून आद्य गौड बहु मंडळाच्या वतीने,रविवारी रोजी रूपम हॉल येथे आयोजित हरियाली तीज महोत्सवात महिलांनी कार्यक्रम आयोजित केला होता. महिला मंडळांनी सांगितले की महिलांनी जीवनाचा आनंद घेता, यावा त्यांच्यातील कलात्मकता व विविध कला समोर यावी या दृष्टीकोणातून सदरील महोत्सवाचा आयोजन करण्यात आले. महिलांनी सदरील कार्यक्रमास उत्कृष्टपणे सहभाग नोंदवला. यावेळी विविध खेळ, रील्स बनवणे, सोळा शृंगाराचे नाव, तसेच सावन क्वीन स्पर्धा आदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यानंतर स्पर्धेतील विजेतांना पारितोषिक देण्यात आले. कोमल तिवारी या सावन क्वीन म्हणून विजेता ठरली. या हरियाली तेज महोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आद्य गौड बहु मंडळाचे, सदस्या रश्मी शर्मा, पूजा शर्मा, आदिती गौड, श्रद्धा शर्मा, अंकिता शर्मा, नेहा शर्मा, वर्षा शर्मा आदी सदस्यांनी परिश्रम घेतली. तसेच सदरील कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# अफू विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

आधुनिक केसरी न्यूज


**पुणे :** पिंपरी-चिंचवडच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने राजस्थान येथील अफू विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी अमली पदार्थ विरोधी पथकाने तीन जणांना बेड्या ठोकल्या आहेत. आरोपींनी चाकणमधील म्हाळुंगे परिसरात गोडाऊनमध्ये अफूची पोती साठवून ती पॅकेटद्वारे विकणार होते. त्या अगोदरच पोलिसांनी त्यांच्यावर छापा टाकून तब्बल ६० किलो अफू जप्त केली आहे. राकेश जीवनराम बिश्नोई, कैलास जोराराम बिश्नोई आणि मुकेश गिधारीराम बिश्नोई अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चाकण म्हाळुंगे परिसरात गोडाऊनमध्ये राजस्थान येथील टोळी अफू साठवत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. विरळ वस्ती असलेल्या ठिकाणी या टोळीने एक गोडाऊन भाड्याने घेतले होते. त्या ठिकाणी टेम्पोतून अफूची पोती आणली जात होती. अमली पदार्थ विरोधी पथकातील पोलिस कर्मचाऱ्यांनी आठ दिवस गोडाऊनवर लक्ष ठेवले. अखेर मुख्य सूत्रधार राकेश जीवनराम बिश्नोई याला पोलिसांनी ताब्यात घेतले.




महाराष्ट्र Business Katta









# ‘लम्पी, गोवर्गीय जनावरांना होणारा त्वचारोग’, माहिती व उपाययोजना

आधुनिक केसरी

**जिल्ह्यात ‘लम्पी स्कीन’ या जनावरांमध्ये आढळून येणाऱ्या त्वचारोगाने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. या आजाराच्या प्रतिबंधासाठी जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभाग युध्दपातळीवर उपाययोजना करत आहे. राज्य शासनाने यापूर्वीच १ सप्टेंबर २०२२ रोजीच्या शासननिर्णयान्वये मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. जनावरांचे वेगाने लसीकरण करण्यात येत आहे. ‘लम्पी स्कीन’ हा नेमका काय रोग आहे. या रोगावर कोणत्या प्रकारचा उपचार करण्यात येतो. शेतकरी, पशुपालकांनी आपल्या जनावरांची नेमकी काय काळजी घ्यावी. याबाबतची माहिती आपण या लेखात जाणून घेणार आहोत.**

‘लम्पी स्कीन’ हा रोग १९२९ पासून १९७८ पर्यंत मुख्यत्वे आफ्रिकेत आढळत होता. नंतर हळूवारपणे या रोगाने शेजारच्या देशात शिरकाव केला. २०१३ नंतर या रोगाचा सर्वदूर प्रसार वेगाने होत आहे. आणि आता हा रोग अनेक युरोपीय व आशियायी देशात पसरला आहे. भारतात या रोगाची पहिली नोंद ऑगस्ट २०१९ मध्ये ओरिसा राज्यात झाली. त्यानंतर झारखंड, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक व केरळ राज्यात या आजाराचा शिरकाव झालेला आढळून आला. महाराष्ट्रात या आजाराचा प्रसार गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा येथून मार्च २०२० या महिन्यापासून झालेला आढळून आलेला आहे. येथील साथरोगाचे पक्के निदान गोपाळ येथील राष्ट्रीय रोगनिदान प्रयोगशाळेत झाले आहे.

**रोगाची कारणे व प्रादुर्भाव -** हा आजार एका विषाणूमुळे गुरांमध्ये परसतो. ज्याला ‘लंपी स्किन डिसीज व्हायरस’ (LSDV) म्हणतात. त्याच्या तीन प्रजाती आहेत. ज्यामध्ये पहिली प्रजाती ‘कॅप्रीपॉक्स व्हायरस’ आहे. त्यानंतर ‘गोटपॉक्स व्हायरस’ आणि ‘मेंढीपॉक्स व्हायरस’ अशा आणखी दोन प्रजाती आहेत. हा साथीचा आजार गोवर्गीय व म्हैस वर्गीय प्राण्यांमध्ये आढळून येत आहे. शेळ्या-मेंढयांत आढळून येत नाही. गोवर्गात तीस टक्के, म्हैसमध्ये १.६ टक्के तुलनेत अधिक प्रमाणात आढळून येतो. सर्वसामान्यपणे देशी गोवंशापेक्षा संकरित जनावरात या आजाराची तीव्रता अधिक असते. या आजारात मृत्यू दर १-५% पर्यंत आढळून येतो. दूग्ध उत्पादन मोठया प्रमाणावर घटते तसेच काही वेळा गर्भपात होतो व प्रजनन क्षमता घटते.

विदेशी वंशाच्या (पाठीवर वशिंड नसलेल्या जर्शी, होल्स्टेन आदी) आणि संकरीत गायीमध्ये देशी वंशांच्या गायींपेक्षा (पाठीवर वशिंड असलेल्या भारतीय जाती) रोगबाधेचे प्रमाण अधिक असते. सर्व वयोगटातील (नर व मादी) जनावरात आढळतो मात्र लहान बासरात प्रौढ जनावरांच्या तुलनेत प्रमाण अधिक असते. आजारामुळे होणाऱ्या मृत्युचे प्रमाण कमी असले तरी रोगी जनावरे अशक्त होत जातात. त्यांचे दूग्ध उत्पादन मोठया प्रमाणावर घटते तसेच कांही वेळा गर्भपात होतो व प्रजननक्षमता घटते. पर्यायाने पशुपालकाचे आर्थिक नुकसान होते.

**रोगप्रसार -** या आजाराचा फैलाव बाह्य किटकाद्वारे (मच्छर, गोचिड, माशा इ.) तसेच आजारी पशुंच्या त्वचेवरील व्रणांमधून वाहणारा स्त्राव, नाकातील स्त्राव, दूध, लाळ, विर्य व इतर स्त्रावामुळे होतो. तसेच या आजाराच्या विषाणूचा संसर्ग निरोगी व बाधित जनावरे यांच्यातील प्रत्यक्ष स्पर्शाने होऊ शकतो. विषाणू संक्रमण झाल्यानंतर ते १- २ आठवड्यापर्यंत रक्तामध्ये राहतात. त्यानंतर शरीराच्या इतर भागात संक्रमित होतात. त्यामुळे नाकातील स्त्राव, डोळयातील पाणी व तोंडातील लाळेतून विषाणू बाहेर पडून चारा व पाणी दूषित होतो. त्यातून इतर जनावरांना या विषाणूचा प्रसार होऊ शकतो. त्वचेवरील खपल्या गळून पडल्यानंतर



त्यामध्ये विषाणू दीर्घकाळ (३५ दिवस) जिवंत राहू शकतात. विर्यात विषाणू येत असल्याने रोगाचा फैलाव कृत्रिम किंवा नैसर्गिक रेतनातून होऊ शकतो. गाभण जनावरांत या आजाराची लागण झाल्यास गर्भपात किंवा रोगग्रस्त वासरांचा जन्म होतो. दूध पिणाऱ्या वासरांना आजारी गायीच्या दुधातून व स्तनावरील व्रणातून रोगप्रसार होतो.

**लक्षणे -** बाधित जनावरांमध्ये या आजाराचा सुप्तकाळ साधारणपणे २५ आठवडे एवढा असतो. या आजारामध्ये प्रथम जनावरांच्या डोळ्यातून व नाकातून पाणी येते. लसिकाग्रंथीना सूज येते. सुरवातीस भरपूर ताप येतो. दूग्ध उत्पादन कमी होते. चारा खाणे, पाणी पिणे कमी होते. डोके, मान, पाय, मायांग, कास इत्यादी भागात १० ते १५ मिमी व्यासाच्या गाठी प्रामुख्याने येतात. काही वेळा तोंड, नाक व व्रण निर्माण होतात. तोंडातील व्रणामुळे आजारी जनावरांना चारा चघळण्यास त्रास होतो. डोळ्यात व्रण येतात यामुळे दृष्टी बाधित होण्याची शक्यता असतो. या आजाराच्या प्रादुर्भावामुळे फुफ्फुसदाह किंना स्तनदाह आजाराची बाधा पशूंमध्ये होऊ शकते. रक्तातील पांढऱ्या पेशी व प्लेटलेटची संख्या कमी होते. पायावर सूज येऊन काही जनावरे लंगडतात.

**रोगनियंत्रण –** हा रोग हा विषाणूजन्य सांसर्गिक रोग असल्याने प्रसार होवू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ अमलात आणणे महत्वाचे आहे. याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रादुर्भावग्रस्त भागापासून ५ कि.मी. च्या त्रिज्येमध्ये येणाऱ्या गावातील गो व महीषवर्गीय पशुंना शेळ्यांच्या देवीवरील लस (GOAT POX VACCINE -UTTARKASHI STRAIN) चा वापर करुन प्रतिबंधात्मक लसीकरण तात्काळ करण्यात यावे. निरोगी जनावरांना या आजाराची लागण होवू नये म्हणून बाधित जनावरांपासून निरोगी जनावरे वेगळी ठेवण्यात यावीत. निरोगी तसेच बाधित जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याकरीता व चराई करीता स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी. निरोगी जनावरांमध्ये या रोगाचा फैलाव विविध प्रकारचे मच्छर, गोचिड, माशा इ. मार्फत होत असल्याने जनावरांचे गोठे व त्या लगतच्या परिसरात मच्छर, गोचिड, माशा इ. निर्मूलन करण्यासाठी विविधि ॲलोपॅथीक व आयुर्वेदिक औषधींचा वापर करुन तात्काळ फवारणी करण्यात यावी. जनावरांचे गोठे व त्या लगतच्या परिसरात संबंधित ग्रामपंचायत / नगरपंचायत / महानगरपालिका यांचे कडील यंत्रणेच्या मदतीने तात्काळ फवारणी करून घेण्यात यावी. तसेच, रोग प्रादुर्भावामुळे जनावरचा मृत्यु झाल्यास त्यांची पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखालील शास्त्रोत पध्दतीने विल्हेवाट लावण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित ग्रामपंचायत,नगरपंचायत, महानगरपालिका यांची आहे.

बाधित जनावरांवर औषधोपचार करण्यासाठी वापरात आणलेल्या सिरींजेस, निडल्स इ. यांचा पुनर्वापर न करता त्या तात्काळ नष्ट करण्यात याव्यात. या रोगाची लागण झालेल्या जनावराची प्रतिकारशक्ती कमी झाल्याने अशा जनावरांना इतर जिवाणूजन्य आजाराची बाधा होण्याची शक्यता असल्याने अशा जनावरांना ५ ते ७ दिवस आवश्यकतेनुसार पशुवैद्यकाच्या सल्ल्याने प्रतिजैविके देण्यात / टोचण्यात यावीत. त्या सोबतच ताप कमी करणारी औषधे, प्रतिकार शक्तीवर्धक औषधी जसे की लिव्हर टॉनिक, जीवनसत्व इ. वेदनाशामक व ॲटी हिस्टॅमिनिक औषधी केंद्र शासनाच्या प्रोटोकॉलनुसार देण्यात यावीत. त्वचेवरील जखमा बऱ्या होण्यासाठी विविध प्रकारचे मलम, औषधी व तेल यांचा वापर करण्यात यावा. प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ मधील कलम ४ (१) नुसार पशु/जनावरांमध्ये या रोगाची लक्षणे आढळून आल्यास प्रत्येक व्यक्ती, अशासकीय संस्था, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी याबाबतची माहिती जवळच्या पशुवैद्यकीय संस्थेस कळविणे बंधनकारक आहे. बाधित जनावरांची तपासणी करणाऱ्या पशुवैद्यकांनी योग्य पोशाख परिधान करावा. हात डेटॉल किंना अल्कोहोल मिश्रित सनीटायझरने स्वच्छ धुवून घ्यावेत. तपासणी झाल्यानंतर कपडे व फूटवेअर गरम पाण्यात धुवून निर्जंतुक करावेत. अशा जनावरांच्या संपर्कात आलेले साहित्य जसे वाहन, परिसर इत्यादी निर्जंतुक करुन घेण्यात यावे. शास्त्रीय दृष्ट्या या साथीच्या काळात दूध उकळून प्यावे किंवा मांस शिजवून खावे. प्रादुर्भाव ग्रस्त भागात जनावरांची ने आण वाहतूक बंदी आणावी तसेच जनावरांचे बाजार बंद ठेवण्यात यावे रोगग्रस्त जनावरचा मृत्यू झाल्यास मृतदेह ८ फूट खोल खड्ड्यात पुरावा. शेतकरी पशुपालकांनी ‘लम्पी स्कीन’ रोगाला मुळीच घाबरून न जाता तात्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये संपर्क साधून आजारी जनावरांवर औषधोपचार करून घ्यावे.

**संकलन - जिल्हा माहिती कार्यालय, औरंगाबाद.**

---

# संविधान बदलण्याची भाषा का केली जाते...?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारताचे संविधान किती ही चांगले असले तरी त्याला नावे ठेवणारांची संख्या कमी नाही. संविधान हे राष्ट्रीय ग्रंथ असुनही आणि आज भारतात साक्षरतेचे प्रमाण वाढले असुनही बहुतांश साक्षर लोकांच्या घरात संविधान नाही. त्याचे अनेक कारणे आहेत. स्वतः ला साक्षर समजणारे परंतु मेंदुचा कोणताही वापर न करणारे लोक संविधान देशाचे असताना केवळ ते बौद्धांचे आहे असे म्हणून, त्यांचा मेंदु काम करत नसल्याचे सिद्ध करून देतात. काही काही बहाद्दर तर संविधान हे बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून घरात आणत नाहीत किंवा त्याला हातही लावत नाहीत, आपण जातीवाद संपला म्हणतो. परंतु जेथे संविधान आणि संविधान निर्मात्यांना च जातीत बंद करून केवळ संविधान लिहणाऱ्याची जात बघून संविधानाला स्पर्श करून घरात आणले जात नाही तो देश जाती निर्मुलन करून समता प्रस्थापित करतो हे म्हणणे म्हणजे स्वतः च स्वतः ची पाट थोपटणे होय.**

आजही विषमतावादी व अस्पृश्यता वादी पिलावळ देशात आहेत. म्हणून समता प्रस्थापित करणाऱ्या व कोणत्याही वर्णाला श्रेष्ठत्व वा कनिष्ठ मानसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार संविधानाने दिला. समता बंधुता स्वातंत्र्य व न्याय याचे संरक्षण जात धर्म वंश पंथ वर्ण बघुन नाही तर माणुस बघुन केले जाते. आणि ह्याच गोष्टी काही विषमतावादी पिलावळींना पचणाऱ्या नाहीत. चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार जी वर्णाची व नंतर जातीची उतरंड तयार केली त्याला जर कोणी धक्का लावला नसेल तर मग सगळं चांगले. माणसामाणसात भेद करून श्रेष्ठत्व कायम राहील्यास विषमतावादी पिलावळींना सर्व काही मान्य असेल. परंतु याच बाबींना संविधानाने नाकारून सर्वांना समसमान केले म्हणून काहींच्या पोटात दुखते. म्हणून अशा विकृत माणसिकतेची लोक मानसिक संतुलन बिघडल्यासारखे बोलून संविधान बदलण्याची भाषा करतात. मनात विषमता आणि डोक्यात इतरांना तुच्छ समजण्याचे विचार असणाऱ्या विकृतीमुळे सामाजिक वातावरण दुषित होऊन शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, यावर नियंत्रण ठेवण्याचे काम सरकारचे असेल तरी सरकारच्या हिंदु राष्ट्र या अजेंड्याला पोषक असलेल्या परंतु मानव, मानुसकी यांना काळीमा फासून संविधान विरोधी कृत्यांना आवर घालण्याची तसदी सरकार घेत नाही. याचाच परिणाम शांतता व सुव्यवस्था प्रश्न उपस्थित राहतो. भारतात बहुसंख्य लोक असे आहेत ते संविधानाचाचा पुर्णपणे फायदा घेतात पण संविधानाचे नाव उच्चारणे, संविधान वाचुन समजून घेणे, व माणसाणे माणसा सोबत माणसा सारखे राहणे त्यांना कमी पणाचे वाटते. संविधानाचे उल्लंघन सरकार सह अनेक संघटना, व नागरिकां कडून नेहमीच केले जाते. संविधान बदलण्याची भाषा करून डोक्यात विषमता व द्वेष किती आहे हे स्पष्ट होतेच परंतु ज्यांनी कधीच संविधानाला हात लावला नाही असे लोक संविधान बदलण्याची भाषा करत असतील तर त्यांच्या डोक्यातील विषमता व सर्वसामान्य लोकांच्या हक्क अधिकारा विषयी त्यांच्या पोटात निघणारी कळ स्पष्ट दिसून येते. भारतात संविधान मसुदा डॉ बाबासाहेब आंबेडकर या जागतिक विद्वांनाने एकट्याने तयार केला आणि तयार केलेला मसुदा दोनशे नव्वद पेक्षा जास्त लोकांकडून समंत करून घेतला. लिहणारे एकटे डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि प्रश्न विचारणारे घटना समितीचे दोनशे नव्वद पेक्षा जास्त सदस्य. एक एक कलमावर चर्चा होऊन संविधान तयार झाले. आणि आज संविधान बदलण्याची भाषा करणारे केवळ संविधानाच्या माध्यमातून फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनाच विरोध करत नाहीत तर यांचे जे पुर्वज घटना समिती मध्ये होते त्यांना ही हे लोक मुर्खात काढत आहेत. कारण संविधान बदलायचे ते आज कामी नाही म्हणजे यांच्या पुर्वजांनी जी मान्यता दिली तर त्यांना कळत नव्हते असेच म्हणावे लागेल. इथे सत्ताधारी लोकांचे शिक्षण विचारले तर गुन्हा दाखल होतो. टेलीप्रॉम्पटर नसेल तर बोलता येत नाही अशा लोकांनी व विषमता वादी पिलावळींनी संविधान बदल्याची भाषा म्हणजे बिडीच्या विस्तवाने सुर्याला गरम करण्यासारखे होय. घटनाकाराकडे विदेशातील गुणवत्तापूर्ण शिक्षण तर होतेच परंतु साठ पेक्षा जास्त देशातील संविधानाचा अभ्यास त्यांनी केला केला होता. आणि काही मतीमंद लोक अभ्यासाला कॉपी समजत असतील तर स्पर्धा परिक्षा देताना केवळ पुस्तकात लिहले तेवढेच वाचुन त्यातही चाळीस टक्के प्रश्न चुकवणाऱ्या लोकांना विद्वान म्हणायचे की कॉपीबहाद्दर? आता यावरही कोणाच्या भावना दुखू शकतात, आम्ही केलेला अभ्यास आहे, आम्ही मेहनत करून गुणवत्तेच्या नावावर पास होऊन पद मिळवण्याचा प्रयत्न करतो असेच त्यांचे मत असेल आणि ते बरोबर ही आहे. जर एक स्पर्धा परिक्षा करणारा विद्यार्थी दहा पुस्तके वाचून परिक्षा देतो आणि पास होतो तर त्याला आपण गुणवत्ता म्हणतो. मग साठ देशाच्या संविधानाचा जागतिक अभ्यास करून जगातील सर्वात मोठे व लिखित संविधान किती गुणवत्तेचे असेल याची जाणीव डोक्यात विषमतेची घाण असलेल्या लोकांना नसणार आहे. संविधान बदलण्याची भाषा का होते याचे प्रमुख कारणे म्हणजे संविधान अस्पृश्य समाजातील ज्यांना शिक्षणाचा हक्क अधिकार नव्हता अशा




महान विद्वांनाने लिहुन इतिहास रचला. या इतिहासाने हजारो वर्षापासून ज्यांच्या शिक्षण ताब्यात होते त्यांच्या गुणवत्तेवर व नैतिकतेवर प्रश्न निर्माण करतो. दुसरे म्हणजे संविधानाने विषमतेची उतरंड नष्ट करून सर्वांना समान केले. हजारो वर्षांपासून जातीच्या, अस्पृश्यतेच्या नावाखाली माणसाला माणसाचा स्पर्श सहन होत नव्हता परंतु संविधानामुळे मागास जातीतील लोक उच्च पदावर जात आहेत व त्यांना साहेब म्हणून आदर द्यावा लागतो हि बाब अनेकांच्या पोटात गोळा आणते. अजून एक कारण म्हणजे संविधानाने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारल्याने बऱ्याच वेळा इच्छे विरूद्ध जाऊन, मनात नसतात सर्वसामान्य लोकांच्या कल्याणाचा विचार करावा लागतो. अजून एक कारण म्हणजे ज्या महिलांना अत्यंत तुच्छ लेखून दासी म्हणून ठेवले जात होते त्या महिला प्रत्येक ठिकाणी संविधानामुळे भरारी घेत आहेत. हिच बाब अनेकांना पचणारी नाही, अजून एक कारण म्हणजे लोक कल्याणासाठी संविधानामध्ये बदल करता येतो परंतु मुलभूत हक्क बदलता येत नाहीत. हे महत्त्वाचे कारण आहे. आणि मुलभूत हक्क बदलता येत नाही म्हणून लोकांना मुलभूत हक्क मिळून लोकांनी वरच्या वर्णातील लोकांना प्रश्नच करू नये असे अनेकांना वाटते. व्यवस्थेनुसार ज्यांना समोर उभे राहण्याचा अधिकार नव्हता तो व्यक्ती जर उभा राहुन प्रश्न विचारत असेल तर अनेकांच्या पोटात मळमळणे सहाजिकच आहे. संविधानाने वर्ण व्यवस्था कायम ठेवून आपल्याला वर्णात मर्यादित हक्क अधिकार दिले असते तर कोणालाच काही हरकत नसती. परंतु सर्वांना समान हि भावनाच पचणी पडणारी नाही. एकाच वर्णाचे वर्चस्व कायम राहुन इतरांनी त्यांची गुलामी करावी व ते सांगतील त्याचेच पालन करावे म्हणजे तो चांगला हिच भुमिका आजही विषमतावादी किड्याची आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदु कोडबिलाच्या मार्फत हिंदु महिलांना क्रांतीची मशाल दिली. परंतु याचे श्रेय डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जाऊच नये म्हणून ते तुकड्या तुकड्यात पास करून दिले. आजही संविधानाच्या बाबतीत तेच होत आहे. हजारो वर्षा पासून शिक्षणाला मर्यादित करून ठेवले, इतरांना शिक्षणाचा गंधही लागु दिला नाही. अस्पृश्य म्हणून ज्यांना जवळही येऊ दिले नाही, तोच व्यक्ती शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या गुणवत्तेच्या जोरवर हजारो वर्षांपासून चालत आलेले सर्व काही क्षणातच तोडून टाकुन जागतिक क्रांती करतो आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाच्या संविधानाचा शिल्पकार होण्याचा बहुमान मिळवतोय. हि गोष्ट खरचं पचणारी आहे का? हा प्रश्न सहज निर्माण होतो. संविधानाने ज्या मराठा ओबीसी समाजाला सत्ताधारी बनण्याचा अधिकार बहाल केला त्याच मराठा ओबीसींना संविधानापासून दुर नेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आज मराठा ओबीसींच्या मुलांच्या हाताला काम नाही, शिक्षण घेणे परवडणारे नाही, नापिकी, दुष्काळामुळे फासावर लटकणारे बहुतांशी मराठा ओबीसी, अशा समस्या असताना या समस्या त्यांना वाटू नये म्हणून धर्माच्या नावाखाली त्यांची दिशाभूल केली जाते. आणि संविधानाची व हक्क अधिकाराची जनजागृती होऊ दिली जात नाहीत कारण संविधान व हक्क अधिकार याबद्दल जनजागृती झाली तर हातातील सत्ता जाण्याची भिती विषमतावादी लोकांना वाटते. म्हणून सामाजिक वातावरण दुषीत होण्यासाठी आणि माणसामाणसात द्वेष कायम राहण्यासाठी संविधान बदलण्याची भाषा केली जाते. विषमता वादी व्यवस्था हानुन पाडण्यासाठी व लोकशाही ला जिवंत ठेवून खऱ्या अर्थाने लोकशाही व स्वातंत्र्याचे फळे चाखण्यासाठी जागृत लोकांनी एकत्र येऊन ईव्हीएम ला विरोध करून बॅलटपेपरवर निवडणूक घेण्याचा आग्रह केला पाहिजे तरच मताच्या हेराफेरीवर निवडून येणे बंद होईल. व मत मिळवण्यासाठी साठी का होईना यांना संविधान व संविधानाचे हक्क अधिकार यांचे रक्षण करणे आवश्यक राहील. म्हणून जागृत होउन ईव्हीएम विरोधात आवाज उठवणे म्हणजे स्वतः जिवंत असुन असण्याचे लक्षण होय.

# अवकाशात वाढत चाललेल्या कचऱ्याचे जगावर संकट



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**अलीकडेच, भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) शास्त्रज्ञांनी अंतराळात वाढत चाललेला कचरा साफ करण्यासाठी प्रभावी प्रयत्न सुरू केले आहेत. इस्रोने उपग्रह प्रक्षेपण यान (सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल -पीएसएलवी सी 56) प्रक्षेपित केले आणि सिंगापूरचे सात उपग्रह अवकाशाच्या उच्च कक्षेत स्थापित केले. यासोबतच या रॉकेटचा निरुपयोगी भाग 300 किमीपर्यंत खालच्या कक्षेत आणण्याच्या प्रयत्नात इस्रोला यशही मिळाले आहे. यामुळे अवकाशातील जंक कमी होण्यास मदत होईलच, शिवाय उपग्रहांच्या हालचालीतील अडथळेही दूर होतील.**

भारताची कामगिरी कौतुकास्पदःपीएसएलवी हे चार भागांचे बनलेले असे रॉकेट आहे, ज्यातील पहिले तीन भाग लक्ष्य साधल्यानंतर समुद्रात कोसळतात आणि शेवटचा भाग पीएस4, उपग्रह अवकाशाच्या कक्षेत सोडल्यानंतर स्वतःच कचऱ्यामध्ये बदलतात आणि उच्च कक्षेतच प्रदक्षिणा घालत राहतात.पण इस्रोच्या या यशानंतर रॉकेटचा हा भाग खालच्या कक्षेत पोहोचल्यानंतर उच्च कक्षेत फिरणाऱ्या उपग्रहांच्या मार्गात कोणताही अडथळा निर्माण करत नाही. अंतराळातील कचरा नैसर्गिकरित्या कमी करण्यासाठी हे एक अनोखे तंत्र आहे.या यशामुळे भारताने अंतराळातील कचरा कमी करण्याची आपली वचनबद्धता पूर्ण केली आहे. न्यू स्पेस इंडियाचे अध्यक्ष डी. राधाकृष्णन यांनी म्हटले आहे की, "मला वाटत नाही की या मोहिमेच्या यशापासून यापेक्षा आणखी चांगल्या गोष्टीची अपेक्षा करता आली असती.'

स्पेस जंक मोठ्या प्रमाणातः पृथ्वीभोवती सध्या सुमारे 2,000 उपग्रह फिरत आहेत. त्याच वेळी, 3,000 हून अधिक निष्क्रिय उपग्रह अवकाशात कचरा पसरवण्याबरोबरच नव्याने प्रक्षेपित केलेल्या उपग्रहांच्या कक्षेत अडथळा ठरत आहेत. ज्यामुळे ते एकमेकांवर आदळण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त, सुमारे 34,000 स्पेस जंकचे तुकडे आहेत जे 10 सेंटीमीटरपेक्षा मोठे आहेत. एवढेच नाही तर असे लाखो छोटे तुकडे अवकाशात तरंगत आहेत, जे कोणत्याही वस्तूशी आदळल्यास विनाशकारी ठरू शकतात. अलीकडेच, ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनाऱ्यावर असा बेलनाकार स्पेस रॉकेटचा कचरा सापडला आहे, ज्याचे वर्णन भारतीय रॉकेटचा टाकाऊ भाग असल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच अवकाशातील उपग्रहांचा कचरा संपूर्ण जगासाठी संकट बनत आहे.

ते कधीही पृथ्वीवर पडू शकतात. 2016 मध्ये सहा टन वजनाचा यूआरए उपग्रह पृथ्वीवर पडला होता. यापूर्वी 1989 मध्ये 100 टन वजनाचा स्कायलॅब उपग्रह हिंद महासागरात पडला होता आणि 2001 मध्ये रशियाचे स्पेस स्टेशन मीर दक्षिण प्रशांत महासागरात पडले होते. मात्र, अंतराळ मोहिमेच्या इतिहासात आजपर्यंत ही जंक्स (कचरा) जमिनीवर किंवा समुद्रात पडल्याने कोणतीही मानवी हानी झालेली नाही, ही समाधानाची बाब आहे.असे असले तरी भविष्यात जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यामुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने आयुष्य पूर्ण केलेले मुदतबाह्य उपग्रह परत आणण्याची मोहीम सुरू केली आहे. या क्रमाने, शास्त्रज्ञांनी मेघा टॉपिक्स 1 (MT1) उपग्रहाची अत्यंत आव्हानात्मक मोहीम पार पाडल्यानंतर पृथ्वीच्या खालच्या कक्षेत पुन्हा प्रवेश केला आणि तो प्रशांत महासागरात पाडला गेला. या यशाचा उल्लेख करत इस्रोने ट्विटरवर लिहिले की, उपग्रह पृथ्वीच्या वातावरणात पुन्हा दाखल झाला आणि पॅसिफिक महासागरावर त्याचे विघटन झाले. याशिवाय भारताने उपग्रहभेदी क्षेपणास्त्र (ए सेट) तयार केले आहे आणि त्याची यशस्वी चाचणीही केली आहे. या चाचणीत एक निष्फळ ठरलेला उपग्रह नष्ट करण्यात आला. अंतराळात क्षेपणास्त्राने साधले गेलेले हे लक्ष्य एक मोठी वैज्ञानिक कामगिरी होती.



अनेक देश या दिशेने सक्रियः मोठया प्रमाणात रॉकेट आणि सॅटेलाईट पार्ट्स जंक म्हणून अवकाशात भटकत आहेत. ही संख्या सुमारे नऊ लाख आहे जे आठ कि.मी. प्रति सेकंद, म्हणजे 25 ते 28,000 किमी. प्रति तास या वेगाने पृथ्वीच्या कक्षेत (LEO) सतत फिरत आहेत. हे असे तुकडे आहेत जे वातावरणात प्रवेश केल्यानंतर पूर्णपणे जळून राख झाले नाहीत. ते केवळ क्षेपणास्त्रांनीच नष्ट केले जाऊ शकतात. ते केवळ क्षेपणास्त्रांनीच नष्ट केले जाऊ शकतात. जपानच्या चार आणि अमेरिकेच्या नासासारख्या अनेक कंपन्या या मानवनिर्मित कचरा साफ करण्यात गुंतल्या आहेत. अनेक देशांच्या खासगी कंपन्याही या क्षेत्रात भविष्यात मोठी संधी म्हणून त्यांचे पाहत आहेत. या दिशेने पुढाकार घेत भारताने एमटी1 नष्ट करून मोठा धाक निर्माण केला आहे. हा वाढता कचरा नष्ट केला नाही तर भविष्यात हा कचरा हवा, पाणी आणि पृथ्वीसाठी मोठ्या संकटाचे कारण बनू शकेल. जपानी कंपनी एस्टोस्केलचे सीईओ नोबू ओकोडा म्हणतात की 22 मार्च 2020 रोजी कझाकस्तानमधील बायकोनूर येथून सोयुझ रॉकेटद्वारे 'एल्सा डी' उपग्रह प्रक्षेपित करून आम्ही आमची मोहीम सुरू केली आहे. हा उपग्रह खराब झालेले उपग्रह आणि यानाच्या कचऱ्याचे मोठे तुकडे काढण्याचे काम करेल. जपानचा दुसरा उपग्रह 'जॅक्सा' इलेक्ट्रोडायनामिक सारख्या वेगाने कचऱ्याच्या कक्षेत फिरण्याचा वेग कमी करेल आणि नंतर हळूहळू वातावरणात ढकलेल. हा कचरा नष्ट करण्यासाठी जर्मनीची अंतराळ संस्था 'डीएलआर' ने लेझर तंत्रज्ञान विकसित केले आहे. अमेरिकन कंपनी नासाने 'इलेक्टो नेट' तयार केले आहे. हे एक प्रकारचे जाळे आहे, जे कचरा बांधून पृथ्वीच्या वातावरणात आणते. बहुतांश कचरा वातावरणात प्रवेश करताच स्वतः जळून नष्ट होते. अमेरिकेतील सहाहून अधिक स्टार्टअप्स या मोहिमेशी संबंधित आहेत. आता अंतराळ शास्त्रज्ञ अवकाशातून पृथ्वीच्या दिशेने पडणारा कचरा पुन्हा वातावरणात आणण्याचा प्रयत्न करत आहेत.यासाठी स्वित्झर्लंडच्या शास्त्रज्ञांनी 'क्लीन स्पेस वन' नावाचा उपग्रह तयार करण्याची घोषणा केली आहे. मौल्यवान अवकाश उपग्रहांचे कचऱ्यांच्या टक्करीपासून संरक्षण करण्यासाठी या सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. सध्या तरी अंतराळातील वाढता कचरा ही पृथ्वी आणि येथे राहणाऱ्या मानवांसाठी संकटाचे कारण बनला आहे, जे कधीही मोठ्या संकटाचे रूप धारण करू शकते, ज्याची स्वच्छता मोहीम जलद गतीने राबविण्याची गरज आहे.

# पत्रकारांवरील हल्ले चिंताजनक

आधुनिक केसरी

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांकडे पाहिले जाते तोच पत्रकार आपला जीव धोक्यात घालून समाजातील चांगल्या - वाईट घटनांचे वृत्तांकन करुन वाचकांच्यापर्यंत पोहचिवण्याचे काम इमाने - इतबारे करत असतो मात्र सद्या पत्रकार म्हणून काम करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे नुकताच घडलेल्या पाचोरा जिल्हा जळगांव येथील घटनेवरुन समोर आले आहे पत्रकार संदीप महाजन यांना स्थानिक आमदार किशोर पाटील यांनी शिवीगाळ करत मारण्याची धमकी देत त्यांच्या कार्यकर्त्यांनी तुंबळ हाणामारी केली असल्याची बातमी वाचनात आली निश्चितच ही घटना महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी अशीच म्हणावी लागेल मारहाण करणाऱ्या गुंडप्रवृत्तीच्या नराधमांवर वेळीच कठोर करवाई केली पाहिजे या जीवघेण्या हल्यांमध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत पत्रकार संदीप महाजन यांचे वडील स्वातंत्र्य सैनिक असून त्यांच्यासह आईनाही दमदाटी केल्याचे समोर आले आहे वृत्त विश्लेषणानंतर हा सारा प्रकार घडल्याने सर्वत्र नाराजीचा सूर उमटत आहे लोकप्रतिनिधींच्या गुंडांनी असा प्रकार करणे शोभनिय नाही या हल्याचा मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने तीव्र शब्दात निषेध नोंदवला असून हल्लेखोरांना अटक करण्याची मागणी केली आहे वरचेवर महाराष्ट्रात पत्रकारांवर जीवघेणे हल्ले होत असल्याने पत्रकारिता धोक्यात आली आहे त्यासाठी भारत सरकारने पत्रकारांच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलणे गरजेचे बनले आहे.

राजू जाधव
मांगूर जि.बेळगांव



# लोणार : अध्यात्म, विज्ञानाची विलक्षण अनुभूती



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**बुलढाणा जिल्ह्यातील पर्यटन आणि प्रेक्षणीय स्थळे यांचा विचार करता सामान्य माणसाच्या जनजीवन याप्रमाणेच प्रचंड उलथापालथ झालेली दिसून येते. बुलढाणा जिल्ह्यामध्ये प्रेक्षणीय स्थळ म्हणून सर्वात जास्त प्रसिद्ध काही असेल तर ते म्हणजे लोणारचे सरोवर हे होय. लोणार येथे साधारण पन्नास हजार वर्षांपूर्वी ही उल्का कोसळली असावी असा पूर्वी समज होता मात्र अरगॉन डेटिंग पद्धतीने सरोवर निर्मिती साडेपाच लाख वर्षांपूर्वी तयार झाले असे आता सिद्ध झाले आहे. जवळपास 70 मीटर रुंदीची 20000 किलोपेक्षा जास्त वजनाची भली मोठी उल्का साधारणपणे बहात्तर हजार किलोमीटर प्रति तास या प्रचंड वेगाने पडल्याने व त्याचवेळी तिच्या प्रचंड वेगाने पृथ्वीच्या गाभ्यामध्ये होणाऱ्या आंतरिक घडामोडींमुळे ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यामुळे जवळपास दोन किलोमीटर व्यासाचे व दोनशे मीटर खोलीचे सरोवर तयार झाले मात्र या भल्यामोठ्या दगडामुळे ज्वालामुखी बाहेर पडला नसावा तो आपल्या आत राहिला असावा असेही शास्त्रज्ञांना वाटते.**

***(मागील अंकावरून)***

शुक्राचार्यांची वेधशाळा जिला नाभी तीर्थ असे म्हटले जाते हे एका प्राचीन वेधशाळा होती असे म्हटले जाते. याबाबत राक्षसांचे गुरु शुक्राचार्य त्यांचा अधिवास लोणार आणि मेहकर या भागात होता की काय याबाबत संशोधन होणे गरजेचे आहे. कारण शुक्राचार्यांची वेधशाळा मेहकरमध्ये सुद्धा दगडाच बांधकाम असलेली आणि भग्नावस्थेत सापडते, शुक्राचार्यांच्या वेधशाळेचे जवळ याज्ञवल्केश्वर ह्या आयुर्वेद तज्ञाचे वनस्पतीचा अभ्यास करून औषध निर्माण करणाऱ्या भट्टीतील राखेची भस्म टेकडी आहे. आजही अर्ध डोकेदुखी चे दुखणे निवारण्यासाठी लोक येथील राखेच्या चकत्या वापरतात, झोपलेला भद्रामारुती किंवा मोठा मारुती या नावाने सध्या जाणारे मारुतीचे मंदिर लोणार धारेपासून दोन तीन किलोमीटर अंतरावर मातमळ या गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर दिसून येते. येथे असलेली मारुतीची मूर्ती चुंबकीय गुणधर्म असलेली असून ती चुंबकीय दगडापासून तयार झालेली आहे. सुरुवातीला अनेक वर्ष आडवी असलेली ही मूर्ती आता उभी करण्यात आली आणि तिच्यावरील शेंदूराचा लेप बाजूला केला असून आता काळ्या चुंबकीय पाषाणात असलेली ही सुंदर मूर्ती समोर आली आहे.

मूर्तीच्या एका पायाला नागाचा वेढा असून दुसऱ्या पायामध्ये कडे आहे. मारुतीच्या पाया खाली नेहमी आढळते तशी शनीची मूर्ती असून आणखी एक मूर्ती तेथे आहे ही मूर्ती पाताळ देवीची आहे असे गावकरी सांगतात, हे मंदिर 1865 मध्ये निजामाचे दिवाण राजा चंदूमल यांनी बांधले. अगस्ती तीर्थ, हटकेश्वर, नारदेश्वर, औदुंबर तीर्थ इत्यादी मंदिरे प्रेक्षणीय आणि उत्कृष्ट बांधकामाचे नमुने आहेत. साधारण सर्व बांधकाम हे दगडांमध्ये असून यादवकालीन बांधकामाचे पडसाद त्यावर उमटले आहेत. पुराणांमध्ये सुद्धा विराज तीर्थक्षेत्र किंवा बैरज क्षेत्र म्हणून लोणारचा उल्लेख आढळतो. धारा तीर्थाचे पाणी वाहत सरोवरामध्ये जाते, धारा तीर्थासमोरच तळ्याच्या आत कमळजा देवीचे मंदिर असून कपिला तिर्था पासून दोन्ही बाजूने सारख्या अंतरावर सरोवराच्या काठावर कमळजा देवीचे मंदिर आहे. हे मंदिर अष्टकोनाकृती असून वरील भाग गोलाकार आहे. या मंदिराच्या समोर सौभाग्य तीर्थ किंवा सासू सुनेची विहीर म्हणून एक विहीर आहे या विहिरीचे मंदिराकडील अर्धे पाणी गोड असून दुसऱ्या अर्ध्या भागातील पाणी खारट आहे हे विशेष. या मंदिरातील व्हरांड्यात चुंबकाची सुई दिशाहीन होते हा भौगोलिक चमत्कार आहे. सम्राट अशोकाच्या राज्याचा लोणार एक भाग होते. गुप्तराजांच्या काळात गुप्त



राजांचे जावई वाकाटक ह्यांनी येथे राज्य केले. त्याशिवाय सातवाहन, राष्ट्रकूट, होयसाय या राजसत्तांनी सुद्धा लोणार शहरावर राज्य केले आहे. धारेच्या उत्तरेला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या काळातील खंडोबाचे मंदिर असून अहिल्याबाईंनी बांधलेले अन्नछत्र सुद्धा लोणार मध्ये आहे. याठिकाणी गोरगरीब लोकांना अन्न वाटप केले जायचे. लोणार शहरात हिंदू मंदिरांसह जैन मंदिरे, बुद्ध विहार, दर्गा इत्यादी आढळून येतात.लोणार येथे खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीचे दर्शन घडून येते. त्याच वेळी आकाशगंगा, भूगोल, विज्ञान यातील विविध चमत्काराचे दर्शन जवळून होते. सरोवरातील पाण्यात नील-हरित शेवाळ, शेवाळामुळे पाण्याचा गुलाबी होणारा रंग असे काही विलक्षण अनुभव आपण सातत्याने घेत असतो. लोणार सरोवर परिसरात विविध औषधी वनस्पती आढळतात. त्याशिवाय दुर्मिळ अशी लतावेली आणि वृक्षसंपदा सरोवर परिसरात दिसून येते. लोणार परिसरामध्ये वेगवेगळ्या प्रजातीचे 50 पेक्षा अधिक पक्षी पर्यटकांना साद घालत असतात. बिबट्या सह इतर काही जंगली प्राणी सुद्धा लोणार अभयारण्यात आढळून येतात. काही लोकांच्या मते अशनीपातामुळे तयार झालेला प्रचंड खड्डा इतकीच ओळख असलेले लोणार खऱ्या अर्थाने वैज्ञानिक आणि सांस्कृतिक तसेच आध्यत्मिक बाबींचा अभ्यास करणाऱ्या साठी एकाच ठिकाणी उपलब्ध असणारे मोठे ज्ञानस्तोत्र आहे अश्या भूमिकेतून आपण लोणारचा अभ्यास दौरा काढून निरीक्षण केले पाहिजेत. हा संपूर्ण परिसर सध्या महाराष्ट्र राज्य वन विभाग आणि महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग यांच्या अखत्यारीत असून अजून अनेक रहस्य लोणारच्या सरोवरात आणि पाण्यात दडलेली असून त्यांच्यावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

# भावांनो ! रक्षाबंधन जवळ येतेय पण लक्षात घ्या ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**भैय्या मेरे राखी के बंधन को निभाना, भैय्या मेरे छोटी बहन को ना भुलाना, ये नाता निभाना, ही भावना भावाप्रती निस्सिम प्रेम करणाऱ्या प्रत्येक बहिणीची असते. हिंदु संस्कृती खरंच आदर्श म्हणावी लागेल. रूढी-परंपरा, रीतीरिवाजाप्रमाणे सण-उत्सव भारतीय समाजात साजरे केले जातात. त्यापैकी राखीपौर्णिमा उत्सव होय. प्रत्येक उत्सवामागे प्रेरणा, ऊर्जा आणि काही आदर्श प्रस्थापित केले जातात. रक्षाबंधन या नावाने उत्सव ओळखल्या जातो. याची सुरूवात केव्हापासुन झाली हे कदाचित माहित नाही. पण मानव उत्पत्ती पासुन झाली निश्चितच आहे. अगदी देवाधिकापासुन साधु संत आणि आजच्या कलियुगात प्रत्येक बहिणीला हा उत्सव भावाप्रती प्रिय असतो. महाभारतात दुशासनाने द्रोपतीचे वस्त्रहरण केलं तेव्हा बंधु श्रीकृष्णाने रक्षण केल्याची कथा आपण ऐकतो अर्थात हे नाते असेच म्हणावे बहिणीच्या पाठीमागे खंबीरपणे उभा रहाणे आणि तिचे रक्षण करणे भावाचे कर्तव्य.**

बहिण अर्थात जिच्याकडे मातृसंस्था म्हणुन पाहिल्या जाते. कुठल्याही अपेक्षा न ठेवता भावावर निःस्वार्थ प्रेम लावते ती बहिण. भावांनो, रक्षाबंधन करा पण या निमित्ताने आत्मपरीक्षण करण्याची आजच्या काळात गरज वाटते. विभक्त कुटुंब पद्धतीचा जास्त प्रभाव वाढल्याने आणि माया, प्रेम या भावना लुप्त पावत असल्याने वैयक्तिक संसार जीवनात गुंतलेल्या भावाकडून खरंच आजच्या परिस्थितीत बहिणीचं संरक्षण होतं का ?हा संशोधनाचा विषय निश्चितच आहे. दरम्यान भावाच्या सर्व चुका पोटात घालुन माफ करणारं एकच शक्तीपीठ ते म्हणजे बहिण...बहिण...बहिण...

लवकर बहिण-भावाचा अर्थात रक्षाबंधन उत्सव जवळ येत असून हिंदु संस्कृतीमध्ये आगळंवेगळं महत्व होय . बहिण-भावाचं नातं वृद्धिंगत करणारा आजचा दिवस म्हणावा लागेल. रक्षाबंधनाची सुरूवात कुणी आणि कधी केली? या विषयात जाण्यापेक्षा मानवी जीवाची उत्पत्ती झाल्यापासुन हिंदु संस्कृतीमध्ये हा उत्सव साजरा होताना आपण पहातो. यामागची प्रेरणा काय असावी? किंवा कशामुळे हा भारतीय समाजात उत्सव सुरू झाला? खरं तर हिंदु समाजात प्रत्येक उत्सवाचं वेगळं महत्व असुन काही तरी आदर्श देणारे उत्सव प्रतिवर्षी साजरे केले जातात. मग दिपावली असेल तर कुटुंब एकत्रीकरण किंवा विजयादशमी असेल तर एकमेकातले द्वेष संपवुन नवा गोडवा तयार करणे असेल. अगदी बैलपोळा सुद्धा मुक्या जनावरांचा तथा बळीराजाचा सण म्हणुन साजरा होतो. पंचमी उत्सवाला सासरी गेलेली लेक माहेरी येते तर लक्ष्मी पुजन अर्थात एक आदर्श समाजामध्ये वेगवेगळ्या उत्सवाचे पेरलेले आहेत. त्यापैकीच राखी पौर्णिमा श्रावणमासी हा उत्सव प्रतिवर्षाप्रमाणे साजरा होतो. सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती, ओवाळीते भाऊराया वेड्या बहिणीची वेडीच माया या उत्सवाचं वर्णन अनादिकाळापासुन वेगवेगळ्या प्रसंगात उदा. चित्रपटात, कवितात, गाण्याच्या माध्यमातुन अनेकांनी केलेला आहे. एका बहिणीच्या भावना भावाप्रती कशा असतात? हे सांगण्यासाठी उल्लेख केलेल्या गाण्याचे बोल महत्वाचे ठरतात. एकत्र कुटुंब पद्धती समाजात जेव्हा होती तेव्हा खरंच रक्ताच्या नात्यात असलेली आपुलकी जीवाभावाचा स्नेह आणि परोपकार या गोष्टी आदर्श घेण्यासारख्या होत्या. कुटुंबातलं वातावरण गजबजलेलं असायचं. बहिण-भाऊ आणि मग कुटुंबकर्ता याची हुकुमत पण हे दिवस आता पहायला मिळत नाहीत. वर्तमानकाळ हा एकत्र कुटुंब पद्धतीचा असुन प्रत्येक जण स्वतःसाठी जगण्याचा प्रयत्न करताना दिसतो. या साऱ्या धावपळीच्या जगात नात्याचा विसर आणि भावना लुप्त पावताना दिसतात. पण दुसरीकडे आजही आपआपल्या परीने का होईना? उत्सवाच्या निमित्ताने होत असलेले एकत्रीकरण आणि समर्पण भाव हा कमी नाही याचा उल्लेख निश्चित करावा लागेल. रक्षाबंधनाच्या निमित्ताने काही गोष्टीची चर्चा निश्चित व्हायला हवी. एक बहिण असते जी आपल्या भावाला मातृ संस्थेच्या रचनेतुन प्रेम लावते. बहिणीसारखं फुकट प्रेम जगात कुणीच करू शकत नाही. आईची माया त्याहुन अधिक बहिणीची माया पराकोटीची असते. एकवेळ स्वतःची पत्नीसुद्धा प्रेम लावण्यात मागे पडु शकेल पण बहिण आणि तिची माया भोळी भाबडी, वेडी असते. आज कितीतरी असे उदाहरणे पुढे येताना दिसतात. अनेक भाऊ आपल्या बहिणीला रक्षाबंधन तर सोडा चार शब्द चांगलं बोलत नाहीत. बहिणीची प्रताडना केली जाते. तिच्या संकटात भाऊ धावुन जात नाहीत. तिला मदत करत नाहीत. एवढंच नाही तर वडिलोपार्जित संपत्तीमध्ये बहिणीला वाटा मिळवुन देणारे कायदे सरकारला करावे लागतात हे दुर्दैव म्हणावे लागेल. पण भावानं कितीही त्रास दिला एव्हाना विचारलं नाही तरी बहिणीचे डोळे भावाचा सुखी संसार पाहण्यासाठी आसुसलेले असतात. तिची मागणी एकच असते भैय्या मेरे राखी को निभाना, या वाक्याचा भावाकडून धनदौलत बहिण मागते असा नव्हे ज्या बहिणीनं आपल्या उजव्या हातात रेशमी धागा बांधलेला असतो. त्याच्या मनाची खुणगाठ जन्मोजन्मी कधीच सुटत नसते. आज भाऊ कुठल्याही संकटात पडला तिला चैन पडत नाही. लगेच भावासाठी धावुन येते. पण बहिण कितीही अडचणीत असली तरीही भाऊ तिथं उभा रहातात का? आत्मपरीक्षणाचा विषय म्हणावा लागेल. बहिणीच्या पाठीमागे उभा रहाणं याचा अर्थ सर्व काही तिला देवुन टाकणं असा नव्हे. आयुष्यभर प्रेमाचा धागा तिच्या सुखाी संसारात खंबीरपणे



पाठीशी उभा राहुन जपला तरी एक कवडीची अपेक्षा न ठेवता ती प्रेम लावते. बहिण एक आई असते, वडिल पण असते सख्खा भाऊ असते लेक पण असते. एवढेच नव्हे तर स्वतःच्या पत्नीपेक्षाही श्रेष्ठ नातं जपणारी माऊली असते. म्हणुनच तिच्या डोळ्यात एकच विचार असतो माझा भाऊ सदा सुखी व्हावा. अनेकदा भावाला वैवाहिक जीवनात पुत्र प्राप्ती नाही झाली तर अगदी वेड्या बहिणीची माया व्याकुळलेल्या अवस्थेत मानसिकता असते. पण त्या विरूद्ध एखाद्या बहिणीच्या जीवनात आलेलं संकट किंवा तिच्या संसारात वैवाहिक जीवनात उभा राहिलेलं दुःख खरंच भाऊ म्हणुन आपण वाटुन घेतो का? अलीकडे नाही हेच उत्तर आहे. त्याचं कारण आपण स्वतःच्या संसार जीवनात एवढं गुरफटुन जातो की आपल्यावर आदेश घरच्याचा चालतो. बायकोने सांगितलं तर बहिणीला फोन लावणारे अनेक महाभाग आजच्या समाज व्यवस्थेत कुटुंब जीवनात पहायला मिळतात. म्हणुनच रक्षाबंधन उत्सव साजरा करताना आत्मपरीक्षण महत्वाचं वाटतं. प्रत्येक बहिणीचा भाऊ सधन किंवा श्रीमंत असेल असं नव्हे. पण एक गोष्ट अजुन समाजात पहायला मिळते. जे बहिण-भाऊ गरिब आपआपल्या परीने जीवन जगतात अशा कुटुंबात या नात्याचे श्रेष्ठत्व बऱ्यापैकी पाळल्या जातो. पण जे भाऊ भांडवलदार पैशावाले आहेत ते आपल्या मस्तीतल्या चंगळवादी भोगवादात बुडुन जातात. त्यांच्या डोळ्यावर बाहेरून आलेल्या नात्याची श्रेष्ठता जास्त असणारी पट्टी बांधलेली असते पण आपल्या रक्ताच्या नात्याला विशेष महत्व देत नाहीत. असं असलं तरी बहिण ती बहिण जिला कळवळा निःस्वार्थपणे भावाचा असतो. ती मागणी काय करते? हे भावा, हे रेशमी बंधन तुला मी बांधते यासाठी हे नातं वर्षानुवर्षे कधीच विसरू नकोस. म्हणुन नात्याचं नुतनीकरण करण्यासाठी कदाचित प्रतिवर्षी श्रावणमासी या उत्सवाच्ाी परंपरा घालुन दिलेली असावी हे तितकंच खरं आहे. मोठा भाऊ असेल तर बहिणीप्रती असलेलं पालकत्व आणि त्या भावना कर्तव्य, जबाबदारीतुन सांभाळायला हव्यात. पण असं घडताना दिसत नाही. बहिण साधी भोळी असते. असं एकच नातं ज्या नात्यात फुकट प्रेम निःस्वार्थपणे लावल्या जाते. ते श्रेष्ठ नातं म्हणजे बहिण-भावाचं. भाऊ संकटात सापडला तर एक वेळ जीवनात आलेली सहचारिणी कमी पडेल त्याहुन श्रेष्ठ बहिण जिला रात्रंदिवस झोप येवु शकत नाही. वास्तविक पाहता बहिण-भावाचं श्रेष्ठत्व सांगणाऱ्या अनेक कथा, चित्रपट, गाण्यातुन व्यक्त केलेल्या भावना समाजात आदर्श देण्यासाठी निर्माण केलेल्या आहेतच. पण आजच्या निमित्ताने बहिणीकडुन रक्षाबंधन करून घेताना भावाने आत्मपरीक्षण करण्याची गरज निश्चित वाटते. त्याचं कारण वर्तमान कलियुगात या नात्याला कुठं तरी वेगळं स्वरूप प्राप्त होताना दिसते. चला तर, मग भावांनो, रक्षाबंधन जरूर करा पण आपल्या बहिणीच्या सर्व सुखात पाठीशी खंबीर उभा रहा. शक्य आहे तेवढी मदत तिला करा. कायद्याने संपत्तीचा वाटा देवु केला असला तरी तुमच्या ऱ्हदयातुन मनाचा मोठेपणा दाखवत वडिलोपार्जित शक्य तेवढं बहिणीला देत चला. कायदा कितीही झाला तरी बहिण आपल्या भावावर कायद्याचा धाक दाखवुन कधीच शस्त्र चालवु शकत नाही.कारण तिचं प्रेम आंधळं असतं. वेडं असतं. भोळंभाबडं असतं. जे भावानं ओळखायला हवं. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे भैय्या मेरे राखी के बंधन को निभाना, भैय्या मेरे छोटी बहन को ना भुलाना, ये नाता निभाना, यापेक्षा दुसरी अपेक्षा बहिणीची असु शकत नाही.यंदाची राखी पौर्णिमा तसं पाहता नैसर्गिक संकटाची दिसते कारण पावसाचा पत्ता नाही खरिपाची पिके आतून गेलेले आहेत त्यातही मायेचा धागा जोपासण्यासाठी शेतकरी भावाची चेहरे कालवणलेली असली तरी क*** मातीतले आपल्या बहिणीच्या रक्षाबंधनासाठी निश्चितच आतुर झालेला असावा हे मात्र नक्की.

# अपयशाकडून यशाकडे...



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारताचे चंद्रयान तीन बुधवारी सायंकाळी सहा वाजून चार मिनिटांनी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचले या ईशाने संपूर्ण देशात एकच जल्लोष झाला चंद्रयान तीन विक्रम लेंडर चे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर शॉप लर्निंग झाले चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारे भारताचे पहिले यान आहे तसेच चंद्रावर पोहोचणारा भारत हा चौथा देश ठरला आहे चंद्रयान तीन चार लंडन मॉडेलचे चंद्राच्या पृष्ठभागावर प्लॅनिंग झाल्याची माहिती भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने दिली आहे.. अपयशातून धडा घेऊन यश कसे मिळवायचे हे या माध्यमातून भारत शिकला आहे. अठराशे किलोचे वजन आणि अब्जावधी भारतीयांच्या आशाआकांक्षांसह १४ जुलै रोजी पृथ्वीवरून झेपावलेल्या चंद्रयान-३च्या 'विक्रम' लँडरने चंद्राच्या पृष्ठभागावर अलगद अवतरण केले आणि भारताने नवा इतिहास घडवला. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) जाहीर केलेल्या अचूक वेळेवर, सायंकाळी सहा वाजून चार मिनिटांनी चंद्रयान चंद्राच्या पृष्ठभागाला स्पर्श करत असतानाचा सोहळा 'लाइव्ह' पाहणाऱ्या कोटय़वधी भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून आला.**

चंद्रावर पोहोचण्याची किमया करणारा भारत हा चौथा देश असला तरी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर 'पाऊल' ठेवणारा भारत पहिलाच. चार वर्षांपूर्वी याच महत्त्वकांक्षेनिशी चंद्रावर झेपावलेले 'चंद्रयान २' चंद्राच्या अगदी जवळ असताना कोसळले होते. मात्र, त्या अपयशातून धडा घेत नव्या जिद्दीने, अधिक ताकदीने चंद्रावर पोहोचलेले 'चंद्रयान ३' संभाव्य जलस्रोतासह चंद्रावरील असंख्य रहस्यांचा भेद करेल, अशी आशा आहे. अमेरिका, चीन, रशिया या बलाढय देशांच्या कोटयवधी डॉलर खर्चाच्या अनेक मोहिमांतूनही जे साध्य झालेले नाही ते अवघ्या सहाशे कोटी रुपयांत 'इस्रो'च्या शास्त्रज्ञांनी साध्य करून दाखवले. १४ जुलै रोजी 'मार्क-थ्री' या प्रक्षेपणयानाच्या मदतीने पाठवण्यात आलेल्या चंद्रयानाने ४१ दिवसांच्या प्रवासात एकदाही निर्धारित मार्गावरून न ढळता, एकही टप्पा न चुकवता चंद्राला गाठले होते. तीच अचूकता बुधवारी अवतरण मोहिमेदरम्यान दिसून आली. चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ हे वैज्ञानिक नाटय रंगले असताना संपूर्ण देश, जगभरातील शास्त्रज्ञ आणि अन्य देशांमध्ये वसलेले भारतीय नागरिक श्वास रोखून याचे थेट प्रक्षेपण बघत होते. चंद्रयान-२ याच टप्प्यावर अयशस्वी होऊन चंद्राच्या पृष्ठावर कोसळले होते. त्यामुळे यावेळी काय होणार, याची धाकधुक प्रत्येकाच्या मनात होती. अखेर ६.०४ वाजता 'विक्रम'चे पाय चंद्राला टेकल्याचे स्पष्ट झाल्यानंतर बंगळुरूमधील नियंत्रणकक्षात टाळयांचा कडकडाट झाला. इस्रोमधील शास्त्रज्ञ-तंत्रज्ञांच्या या जल्लोषात क्षणार्धात प्रत्येक देशवासीय सहभागी झाला. 'ब्रिक्स' परिषदेसाठी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे गेलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृष्य प्रणालीद्वारे 'इस्रो' नियंत्रणकक्षाशी जोडले गेले होते. मोहीम फत्ते होताच पंतप्रधानांनी संशोधकांचे आणि देशवासियांचे अभिनंदन करत भारताच्या संकल्पाची ही पूर्तता असल्याचे गौरवोद्गार काढले.

'विक्रम'च्या यशस्वी अवतरणानंतर आता त्यामध्ये बसविलेला २६ किलो वजनाचा 'प्रज्ञान' हा रोव्हर चंद्रपृष्ठावर उतरेल. या स्वयंचलित रोव्हरमध्ये कॅमेऱ्यासह अन्य पृथ्थकरण पृत्थकरण पृथक्करण करणारी उपकरणे आहेत. त्याच्या मदतीने चंद्रपृष्ठावरील माती, वातावरण आदीचा अभ्यास केला जाईल. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर असलेले पाणी, अन्य महत्त्वाची खनिजे यांची माहितीही 'प्रज्ञान'च्या माध्यमातून गोळा केली जाईल.

चंद्राचा दक्षिण ध्रुव त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्यांमुळे आणि संभाव्य वैज्ञानिक मूल्यामुळे वैज्ञानिक शोधाच्या केंद्रस्थानी आहे. असे मानले जाते की दक्षिण ध्रुवावर पाणी आणि बर्फाचे मोठे साठे आहेत जे कायमचे गडद राहतात. भविष्यातील अंतराळ मोहिमांसाठी पाण्याची उपस्थिती खूप महत्त्वाची आहे कारण त्याचे रॉकेट इंधन म्हणून पिण्याचे पाणी, ऑक्सिजन आणि हायड्रोजन यासारख्या संसाधनांमध्ये रूपांतर केले जाऊ शकते. हे क्षेत्र कायमस्वरूपी सूर्यप्रकाशापासून दूर आहे आणि तापमान उणे 50 ते उणे 10 अंश सेल्सिअस पर्यंत आहे, जे रोव्हर किंवा लँडरमधील इलेक्ट्रॉनिक घटकांना चांगल्या प्रकारे कार्य करण्यासाठी आदर्श रासायनिक परिस्थिती प्रदान करतात.

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर काय आहे 'तिथला भूभाग किंवा भूगर्भीय परिस्थिती चंद्राच्या इतर भागांसारखीच आहे की आपल्याला त्याबद्दल काहीच माहिती नाही' चंद्राच्या दक्षिण ध्रुवाचा भूप्रदेश आणि भूवैज्ञानिक रचना त्याच्या इतर प्रदेशांपेक्षा वेगळी आहे. कायमस्वरूपी सावलीत असलेल्या खड्ड्यांची थंड स्थिती असते, ज्यामुळे बर्फाच्या स्वरूपात पाणी गोठण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण



होते. दक्षिण ध्रुवाच्या विशेष भौगोलिक स्थितीमुळे येथे सूर्यप्रकाश बराच काळ येतो, ज्याचा उपयोग सौरऊर्जेसाठी करता येतो. भूभाग खडबडीत ते तुलनेने सपाट आहे, अभ्यासासाठी विविध वैज्ञानिक संधी प्रदान करतो.

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर अनेक प्रचंड मोठी विवरे आहेत. त्यामुळेच या भागात आतापर्यंत उतरणे एकाही देशाच्या यानाला शक्य झाले नव्हते. दक्षिण ध्रुवावरील अजस्त्र विविरांमध्ये मोठया प्रमाणात बर्फ असल्याचे पुरावे संशोधकांना मिळाले आहेत.या बर्फाच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब झाले आणि तो बाहेर काढून वापरणे शक्य झाले, तर भविष्यातील अंतराळ मोहिमांसाठी त्याचा उपयोग करता येईल. बर्फ वितळवून पिण्यासाठी तसेच उपकरणे थंड करण्यासाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. पाण्याचे विघटन करून इंधन म्हणून हायड्रोजन आणि श्वसनासाठी ऑक्सिजनची निर्मिती करता येईल.

# रेल्वेतील प्रवाशांसाठी आता 'तेजस्विनी'

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी एकट्याने प्रवास करणाऱ्या महिलांची छेड काढण्याचे आणि त्यांना लुटण्याचे प्रकार वारंवार घडू लागले आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने तेजस्विनी पथकाची स्थापना केली आहे. या पथकातील महिला कर्मचारी रेल्वेने प्रवास करून महिलांच्या सुरक्षिततेची काळजी घेत आहेत.

मध्य रेल्वेच्या पुणे विभागात रेल्वे सुरक्षा दलाने हे पथक स्थापन केले आहे. या पथकाकडे केवळ प्रवासी महिलाच नव्हे, तर मुलांच्या सुरक्षिततेचीही जबाबदारी आहे. तेजस्विनी पथकाचे काम स्वातंत्र्य दिनापासून सुरू झाले.

या पथकात सहायक उपनिरीक्षक पूनम शर्मा आणि दोन महिला कर्मचारी आहेत. हडपसरच्या निरीक्षक प्रीती कुलकर्णी यांच्याकडे या पथकावर देखरेखीची जबाबदारी आहे. तेजस्विनी पथकाकडून दररोज डेक्कन, इंटरसिटी, सिंहगड एक्स्प्रेस आणि दैनंदिन लोकल गाड्यांमधील महिला प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या सुरक्षिततेविषयक अडचणी जाणून घेण्यात येत आहेत. महिलांवरील हिंसाचाराला आळा घालण्यासाठी रेल्वे हेल्पलाइन क्रमांक १३९ आणि विभागीय सुरक्षा नियंत्रण कक्ष क्रमांक ७२१९६१३७७७ उपलब्ध आहेत. याबाबत महिला प्रवाशांमध्ये जनजागृती केली जात आहे. वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त उदयसिंह पवार यांच्या नेतृत्वाखाली हा जनजागृतीचा कार्यक्रम सुरू आहे, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. रामदास भिसे यांनी दिली.

# पावसाअभावी खरिपाची पिके धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** सुलतानपूर, खुलताबाद तालुक्यात पावसाने दांडी मारल्यामुळेखरीपाची पिके अडचणीत आले आहे. पाऊस नसल्याने पिकाची वाढ खुंटलेली असून हलक्या जमिनी मध्ये पिके आता माना टाकत असून खरीप पिके वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. पाऊस न पडल्यामुळे पिकाची वाढ खुंटली असून उत्पादनात ही मोठी घट होण्याची शक्यता आहे. खुलताबाद तालुक्यात जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जेमतेम पाऊस पडला होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी कपाशी, मका, तूर, सोयाबीन सह इतर पिकांची पेरणी केली. त्या नंतर रिमझिम पावसावर कोवळी पिके बहरली असतांनाच आता पावसाने दांडी मारल्याने पिकावर गंभीर संकट ओढवले आहे.. पावसाअभावी पिके करपू लागली आहेत. दररोज आकाशात काळे ढग दिसतात. मात्र ते पाऊस न पाडताच पांगत आहेत. त्यामुळे शेतकरी पावसाची आतुरतेने वाट पाहात आहेत. पावसाने ओढ दिल्यामुळे पिके कोमेजले आहेत. तालुक्यात एकही मोठा पाऊस पडला नसल्यामुळे नदी, नाले अद्यापही तहानलेले असून विहीरीनेही तळ गाठला आहेत. भविष्यात चारा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनणार आहे. पाणीटंचाईमुळे दुधाच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. दरवर्षी पाऊस असल्यामुळे हिरवा चारा मिळतो. यावर्षी अद्याप हिरवा चारा नसल्याने दुधाचे उत्पादन घटले आहे. जून व अर्धा आगस्ट कोरडा गेल्याने यंदाचा खरीप हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



# फुलंब्री प्रशासनाने केली पीक पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यात काही दिवसांपासून पावसाने ओढ दिली. त्यामुळे पिकांची परिस्थिती नाजूक आहे. त्या अनुषंगाने तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुले यांच्यासह तालुका प्रशासनाने बुधवारी (२३ ऑगस्ट) पीरबावडा महसूल मंडळातील गावांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. या वेळी शेतकऱ्यांनी पाऊस नसल्याने चिंता व्यक्त केली.

फुलंब्री तालुक्यात एकूण भौगोलिक क्षेत्र ७१ हजार ८२७ हेक्टर असून पेरणी लायक क्षेत्र ५७ हजार ४७४ हेक्टर आहे. त्यापैकी खरीप २०२३ मध्ये ५७ हजार १२२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली असून, बऱ्याच दिवसांपासून पावसाने ओढ दिल्यामुळे पिकांची परिस्थिती नाजूक आहे. तालुक्यात एक जूनपासून २२ ऑगस्टपर्यंत एकूण पडणाऱ्या पावसाच्या सरासरीच्या केवळ ६६.१० टक्के पाऊस पडला आहे. त्यामुळे पिकाला पाण्याचा ताण बसला आहे. तालुक्यातील पीरबावडा महसूल मंडळात २३ जुलै २०२३ ते १८ ऑगस्ट २०२३ पर्यंत २७ दिवसांचा पावसाचा खंड पडला आहे. तालुक्यात खरीप हंगामात ३६ हजार ६२६ शेतकऱ्यांनी विविध पिकांचा एकूण ९४ हजार ०४९ अर्जाद्वारे विमा काढला आहे. सरकारच्या पीकविमा मार्गदर्शक सूचनांप्रमाणे २१ दिवसांपेक्षा जास्त पावसाचा खंड असल्यास तालुकास्तरीय समितीने पाहणी करणे आवश्यक असल्याने फुलंब्री तालुक्याचे तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुले, तालुका कृषी अधिकारी भारत कासार, मंडळ कृषी अधिकारी निवृत्ती जोरी, विमा कंपनी जिल्हा समन्वयक ईश्वर भिंगारे, तालुका प्रतिनिधी विशाल सोनवणे यांनी शेतकऱ्यांसह पिरबावडा महसूल मंडळातील गावांची प्रत्यक्ष शेतात जाऊन पीक परीस्थितीची पाहणी केली. या वेळी पावसाअभावी पिके कोमेजून जात असल्याचे निदर्शनास आले. प्रत्यक्ष शेतात शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे आपले गाऱ्हाणे मांडले. याबाबत पाहणी करून राज्य सरकारकडे तत्काळ अहवाल पाठविला जाईल,' असे तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुले आणि तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले.

# आ. बंब यांच्या उपस्थितीत अनेकांचा भाजप प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** देवनाळा खु.व देवनाळा बु. या ठिकाणी आ. प्रशांत बंब यांनी गावातील नागरिकाच्या उपस्थित गावातील नागरिकाशी संवाद साधुन विविध विकास कामे , विविध समस्या जाणून घेऊन मार्गदर्शन करण्यात आले. आमदार प्रशांत बंब यांच्या कामावर विश्वास ठेवून शेकडो नागरिकानी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला, प्रवेश केलेल्या सर्व गावातील नागरिकाचे आमदार प्रशांतजी बंब यानी अभिनंदन केले. या कार्यक्रमात कामगार कल्याण योजनेंतर्गत 99 लाभधारकाना सुरक्षा संच देण्यात आले. जि.प पा.शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची गुणवत्तेबाबत शिक्षकाशी चर्चा करून गुणवत्ता चांगल्या दर्जेदार करण्याच्या सुचना शिक्षकांना दिल्या. दलित वस्तीत जाऊन परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तेथील वस्तीवरील नागरिक महिला व पुरुष याच्या सोबत विकास कामे, व वस्तीतील समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमास भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, सरपंच नईम शेख, जि.प उपाध्यक्ष एल.जी. गायकवाड,माजी सभापती गणेश नाना अधाने, उपसभापती दिनेश अंभोरे, प्रकाश चव्हाण , ज्ञानेश्वर नलावडे, प्रभाकर शिंदे, उपाध्यक्ष सुरेश मरकड, नगरसेवक परसराम बारगळ, आशिष कुलकर्णी, अविनाश कुलकर्णी, राहुल निकुंभ, आमदार साहेबाचे स्विय सहाय्यक रज्जाक पठाण, गोपाल वर्मा, राहुल चव्हाण, सुमित चाबुकस्वार, शिवनाथ गायके,प्रशांत गदानकर, अमोल गवळी,सतिश खंडागळे, संतोष घुसिंगे, युसूफ पठाण,अविनाश वेताळ, बंडु शिंदे, आजिनाथ जाधव, सुरेश जाधव,आनंदा काटकर, विनोद कामठे, आदी कार्यकर्त्यांसह पदाधिकारी उपस्थित होते. एकनाथ मालोदे , पाशु पठाण,संजय साळुंके, गोरक साळुंके,संजय शिंदे, अंकुश साळुंके,चांद शेख, सुभाष मोरे, संतोष मोरे,शेकनाथ गायकवाड, दत्ता मालोदे,सोनु बनकर, अलीम शेख,कडुबा काळे, सुभाष काळे,मुजीब शेख,विशाल मोरे, पुंडलिक पांडव, शेकनाथ गायकवाड, सुरेश साळुंके,चंद्रकांत साळुंके, दिपक मोरे,लक्ष्मण पांडव, बाबासाहेब मालोदे,शाकिर पटेल, दत्ता अधाने,गणेश घोडके, योगेश अधाने, पवन चव्हाण, बबलु घोडके,जाकिर पटेल, राहुल कोरडे, सचिन साळुंके, सचिन लकडे,सलीम पटेल, जावेद पटेल,गणेश चव्हाण, संदिप गायकवाड,मुसा सय्यद, कय्युम पटेल,अस्लम शेख, संकेत कोरडे अनेक नागरिकानी भारतीय जनता पक्षात आज प्रवेश केला. उपस्थित सर्व पदाधिकारी व पक्षप्रवेश केलेल्या नागरिकाचे तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे यांनी आभार व्यक्त केले.



# विविध मागण्यांसाठी महाविकास आघाडीचे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील महाविकास आघाडी कडून तहसील कार्यालय तहसीलदार यांना विविध पमुख मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तालुक्यातील सन २०२२-२३ सततच्या पावसामुळे अतिवृष्टी ढगफुटी सदृष्य पावसाने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते त्याची नुकसान भरपाई अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना मिळाली नाही. ती नुकसान भरपाई तात्काळ देण्यात यावी. कांदा वरील निर्यातशुल्क कमी करण्यात यावा. तालुक्यातील सर्व मंडळामधील पिकांचा पंचनामा करून २५टक्के आघाऊ पिक विमा योजनेचाचा लाभ द्यावा, राष्ट्रीयकृत बँकेची सक्तीची वसुली त्वरित थांबवावी. या मागणीसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (ठाकरे) विकास आघाडीच्या वतीने खुलताबाद तहसील कार्यालय मा.तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. तालुकाध्याक्ष अनिल भाऊ श्रीखंडे, तालुकाध्यक्ष शिवसेना वरकड, राष्ट्रवादी काँग्रेसचे विलास पाटील चव्हाण, जगन्नाथ खोसरे, शंकरराव पाटील अधाने, आबेद जाहगिरदारसह मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. यासाठी नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. आघाडीने सर्वांचे आभार मानले.





# धर्माबादच्या रेल्वे स्टेशनवर 'मिल बैठे थे तीन यार'

## एक विस्तार अधिकारी, दोन ग्रामसेवक आणि दारूच्या बाटल्या

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्याचे विस्तार अधिकारी संजय मिरजकर, पांगरीचे ग्रामसेवक किशोर सोनटक्के,दिग्रसचे ग्रामसेवक आर.एम.मुंडे या तीन महाशयानी ड्युटी झाल्यानंतर बुधवारी ( ता.२३) देवगिरीने रिटर्न जात असताना सर्व संकेत व कायदे धाब्यावर बसवत धर्माबादच्या रेल्वे स्टेशनलाच धाबा समजून( ?) मद्यपान करत बसले होते. रेल्वे पोलीस प्रशासनाने वेळीच यावर नियंत्रण मिळवत त्यांच्यावर पोलीस कारवाई केली. त्यांचे मेडिकलही करण्यात आले आहे. त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया चालू होती मात्र त्यांच्यावर कोणते कलम लावण्यात आले याची माहिती मिळू शकली नाही.

धर्माबाद ते तालुक्याचे शहर रेल्वेमार्गांवर असल्याने येथील बहुतांश कर्मचारी नांदेड टू धर्माबाद देवगिरी टू देवगिरी अप डाऊन करतात. त्यामुळे धर्माबादच्या शासकीय कार्यालयाची चालू व बंद होण्याची वेळ ही देवगिरीच्या वेळापत्रकवर अवलंबुन आहे.

त्यात ही रेल्वे स्थानाकावर हे उतरल्यावर सरळ ऑफिस गाठतील ते कसले शासकीय कर्मचारी? त्यांना अगोदर चहा पान, नाष्टा झाल्यावर ते ऑफिस मध्ये येतात. त्यात आता मदिराची ही भर पडली आहे. त्याचे झाले असे की, बुधवारी संध्याकाळी पाच वाजता च्या सुमारास देवगिरीने अप डाऊन करणारे विस्तार अधिकारी संजय मिरजकर, पांगरीचे




ग्रामसेवक किशोर सोनटक्के, दिग्रसचे ग्रामसेवक आर.एम. मुंडे या तीन महाशयानी ऑफिस मधून बाहेर पडले. पण त्यांना मदिरेचे स्मरण झाले. पण देवगिरी निसटता कामा नये आणि दारू ही डोसता आली पाहिजे यासाठी त्यांनी रेल्वेस्थानकाच्या परिसरातच मिल बैठे तीन यार म्हणत, मद्यापन सुरु केले. अलीकडे धर्माबाद रेल्वे स्थानकावरील पोलीस हे सतर्क असून रिकामचोट फिरणारे, नियम व कायद्याचं उल्लंघन करणाऱ्यावर कडक कारवाई करीत आहेत. त्यामुळे गुन्हेगारावरही वचक निर्माण झाली आहे. मात्र कायद्याच पालन करणारेच अलीकडे कायदा धाब्यावर बसवीत आहेत. विस्तार अधिकारी मिरजकर व ग्रामसेवक मुंडे व सोनटक्के यांना दारू इतकीच प्रिय असेल तरी त्यांनी सार्वजनिक ठिकाणाच्या संकेताचे, कायद्याचे पालन करणे आवश्यक होते. नसेल तर त्यांनी खुशाल राजीनामा द्यावा मुक्त मद्यपान करावे.

> आम्ही वेळावेळी देवगिरीने अप डाऊन करणाऱ्या कर्मचारी - अधिकाऱ्यांमुळे लोकांचे कसे नुकसान होतं आहे हे निदर्शनास आणून दिले . बेशरमाचे फुल ही देऊन बघितले, रिकाम्या खुर्च्यांना हार ही घातले . मात्र वरिष्ठानाच येथील कर्मचाऱ्यांकडून लक्ष्मी दर्शन होते की काय? त्यामुळे यांना पाठीशी घातले जाते की काय? अशी शंका येऊ लागली . विस्तार अधिकारी व ग्रामसेवकांची घटना तर लाजिरवाणी आहे . कसली वाट बघता यांना निलंबित करा .
> **- गणेश गिरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख, नांदेड**

अन्यथा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांचे निलंबन करावे अशी मागणी जोर धरतं आहे.

# तणनाशकाच्या अतिवापरामुळे चव देणाऱ्या रानभाज्यांच्या क्षेत्रात घट

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये वापर करण्याच्या नावाखाली पिकांमधील तणनियंत्रणासाठी शेतकरी विविध प्रकारच्या तणनाशकाचा वापर करीत आहेत. परिणामी गावगाड्याला प्राचीन काळापासून चव देणाऱ्या रानभाज्या नष्ट होऊ लागल्या आहेत. पूर्वजांनी जपलेला हा ठेवा संवर्धनासाठी शेतक-यांत प्रबोधनाची आवश्यकता आहे.

दरवर्षी पावसाळ्यात हमखास येणाऱ्या पातर, तांदुळजा, माठ, आंबटचुका, भुईआवळा, आघाडा, टाकळा, खापरखुटी, कटूर्ले, चिवळी भाजी अशा असंख्य पौष्टिक आणि औषधी पालेभाज्या ग्रामीण भागातील लोकांच्या जिभेचे चोचले पुरवीत आरोग्यासाठी फलदायी ठरत असत. मात्र आधुनिक शेतीच्या नावाखाली तणनाशकांच्या फवारणीमुळे बहुतांश रानभाज्या नामशेष होऊ लागल्या आहेत. त्यामुळे आता बाजारात उपलब्ध पालेभाज्यावरच समाधान मानावे लागत आहे. रानभाज्या संदर्भात शेतकऱ्यांत प्रबोधनाचा अभाव असल्याने या भाज्या लुप्त होत आहेत. ग्रामीण भागात पावसाळा सुरू झाला की महिनाभरातच रानभाज्या रोजच्या जेवणात यायच्या. अशा प्रत्येक रानभाजीत काहीतरी औषधी गुणधर्म आहे. त्यामुळे या भाज्या लोक आवर्जून खात असत. तसेच त्या आरोग्यालाही लाभदायक असायच्या. सध्या रानभाज्या दुर्मीळ होत आहेत. मागील २५ वर्षापासून शेतकरी शेतातील तण नियंत्रणासाठी तणनाशकांचा वापर करू लागले आहेत. त्यात रानभाज्यांचाही नष्ट लागल्या व आता उगवेनाश्या झाल्या आहेत. यामुळे शेतकरी व मजुरांना विनामूल्य मिळणाऱ्या रानभाज्या आहारातून गायब झाल्या आहेत. रानभाज्या मिळणे अवघड झाल्याने लोकांना आता बाजारातील भाज्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. रासायनिक खतांचा वारेमाप वापर होत असल्याने बाजारातील पर्यायी पालेभाज्या आरोग्यास अपायकारक ठरु लागल्या आहेत.




# वाहतूक शाखेने केला हजारोंचा दंड वसूल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** 24 ऑगस्ट रोजी10:30 ते 12:30 वाजे पावेतो संतोषी माता चौकात शहर वाहतूक शाखेचे सह पोलीस निरीक्षक कोते साहेब व सोबतचे अंमलदार असई जितेंद्र आखाडे, पोहेकॅ भागवत पाटील, राजेंद्र पवार, पोना नरेंद्र पवार, पोलीस कॉन्स्टेबल तौसीफ शेख, विवेक वाघमोडे, दीपक दामोदर, प्रमोद शिंदे, चालक सुनील कुलकर्णी, नितीन ओतरी यांच्यासह मागील दंड वसुली मोहीम राबविण्यात आली. त्यावेळी वाहनधारकांकडून 45000 दंडाची रक्कम वसूल केली.



# संविधान बदलण्याची भाषा करणाऱ्या देबरॉयवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेले भारतीय संविधान बदलण्याची भाषा करणाऱ्या देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी साहेबांचे आर्थिक सल्लागार बिबेक देबरॉय यांनी केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान लिहून देशाला लोकशाही दिली आहे. या संविधानाच्या माध्यमातून भारतातील प्रत्येक नागरीकाला समान अधिकार, हक्क दिले आहेत. संविधान बदलण्याची भाषा करणे हे वक्तंव्य देशविरोधी व संविधानविरोधी आहे. त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी बिबेक देबरॉय यांचा जाहीर निषेध केला आहे. तसेच देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांना मागणी केली आहे की, बिबेक देबरॉय यांना तात्काळ निलंबित करून त्यांचेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशा आशयाचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) गटाच्या वतिने निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते साहेब यांच्याकडे जिल्हाध्यक्ष मनिष नरवडे यांच्या शिष्टमंडळाने दिले. यावेळी जिल्हाउपाध्यक्ष योगेश उबाळे, आकाश साबळे, अमित बनकर उपस्थित होते.

# बाप समजावून घेताना व्याख्यानाचे आयोजन

## प्रा. वसंत हंकारे यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** तालुक्यातील बिडकीन येथील आनंदेश्वरी



बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व वरद हॉस्पिटल अँन्ड आय सी यु यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सुजित लॉन्स शेकटा रस्ता येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव व रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वावर मुले-मुली व महिलांच्या जीवनास दिशा देणारा प्रेरणादायी व हृदयस्पर्शी आसा प्रा. वसंत हंकारे सांगली यांचे बाप समजावून घेतांना व्याख्यान बिडकीन येथे आयोजित करण्यात आले आहे.

व्याख्यान कार्यक्रमासाठी उपविभागीय अधिकारी सोहम वायाळ, पैठण तहसीलदार सारंग चव्हाण, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, गटशिक्षणाधिकारी प्रकाश लोखंडे, बिडकीन सहायक पोलिस निरीक्षक गणेश सुरवशे, नाथ मंदिर विस्वस्त विठ्ठल शास्त्री चनघटे, सरपंच अशोक धर्मे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

व्याख्यानासाठी बिडकीन व परिसरातील सर्व शाळा, महाविद्यालयातील इयत्ता आठवी ते पदवीचे विद्यार्थी सहभागी होणार असुन बिडकीन शहर व पंचक्रोशीतील युवक - युवती, महिला, पालक, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी व गांवक-यानी सहभाग नोंदवावा असे आवाहन आनंदेश्वरी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व वरद हॉस्पिटल अँन्ड आय सी यु बिडकीन यांनी केले आहे.


# ई-पीक पाहणीला नेटवर्कचा अडथळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव** सावळदबारा परिसरात सोयगाव महसूल विभाग आणि कृषी विभागाच्या वतीने ई-पीक पाहणी हा संयुक्त प्रकल्प दोन वर्षापासून राज्यभर राबवण्यात येत आहे. मात्र ई-पीक पाहणी हे ॲप अनेक शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरतेय. ग्रामीण भागात नेटवर्कचा प्रश्न आणि अनेक शेतकऱ्यांना या ॲपव्दारे माहिती कशी भरायची याची पूर्ण माहिती नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी नोंदणीकडे पाठ फिरवत आहे.

सोयगव महसूल विभाग आणि कृषी विभागाच्या वतीने ई-पीक पाहणी हा संयुक्त प्रकल्प राज्यभर राबवण्यात येत आहे. माझी शेती, माझा सातबारा, मी करेल माझा पिकपेरा या घोषवाक्याचा आधारे शासनाने मोबाईलद्वारे ऑनलाईन पद्धतीने दोन वर्षांपूर्वी राज्यात सुरुवात केली. सावळदबारा आदींसह अनेक दुर्गम भागातील गावांत मोबाईल नेटवर्कची अडचण भासत आहे. तीन दिवसांपासून नोंदणीसाठी प्रयत्न करत असून ई. पीक पाहणी ॲप सुरूच होत नाही. दोन वेळेस डिलीट करून नवीन ॲप घेतले तरी नोंद होत नाही कृषी विभाग व महसूल विभागाने नोंदणी साठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावं किंवा शेतकऱ्यांच्या पीक नोंदीसाठी काही उपाययोजना करावी असे शेतकरी तथा कापसाचे व्यापारी मो.रफीक मो.शब्बीर सावळदबारा यांचे म्हणणे आहे.

ई-पीक पाहणीसाठी शेतकऱ्यांना शेतात जाऊन शेतातील पिकाचा लोकेशनसह फोटो अपलोड करावा लागतो.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# फळगळतीने मोसंबी बागायतदार संकटात

आधुनिक केसरी न्यूज

**मुद्दसीर बेग**

**घनसावंगी :** मराठवाड्यातील जालना जिल्हा हा मोसंबीफळ भागासाठी प्रसिद्ध आहे. त्यातच जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यात मोठ्या प्रमाणात मोसंबीचे फळबागा आहे. परंतु यंदा मोसंबी बागातदार फळगळतीने संकटात सापडलेला आहे जवळपास 40 ते 50 टक्के माल हा खाली गळून पडलेला आहे. काही भागात अक्षरशा मोसंबी बागा खाली झालेल्या आहे. सध्या मोसंबीला आंब्या बहारचा माल आहे ह्या बहरचा माल जवळपास शेतकरी दिवाळीपर्यंत ठेवतात परंतु सध्या अशी परिस्थिती आहे की मोसंबी तोडणीला येण्या अगोदरच पिवळी पडून खाली पडत आहे. व मार्केटला ही सध्या शेतकऱ्यांना हवा तसा भाव मिळत नाही मोसंबी ही मार्केटला कवडीमोल भावाने विकल्या जात आहे. मोसंबी बागावर लावलेला खर्च देखील वसूल होणार नाही असे चित्र सध्या दिसून येत आहे. या मागील वर्षी ही मोसंबी बागातदाराला सततच्या अतिवृष्टीच्या पावसामुळे फटका बसला होता या अतिवृष्टीच्या पावसामुळे मोसंबीला बुरशी लागून मोसंबीच्या फळांचा झाडाखाली पडून खच झाला होता. शेतकऱ्यांच्या मागें नेहमीच संकटाची मालिका सुरू असते कधी आसमान इतर कधी सुलतानी संकटाला शेतकऱ्याला सामोरे जावे लागत आहे . शेतकऱ्यांनी होतं नव्हतं ते सर्व खर्च बागेवर केल परंतु ऐन वेळेवर फळ गळतीने शेतकऱ्यांना जबरदस्त फटका बसलेला आहे. अशावेळी शेतकऱ्यांन समोर मोठं संकट उभा टाकलेला आहे. मुला बाळाचे शिक्षण लग्न समारंभ कुटुंबातील सदस्याच्या गरजा कशा पूर्ण कराव्या या चिंतेत शेतकरी हवालदिन झालेला आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांनी मोसंबी वर आण्यात रोग पडत असल्याने मोसंबी बागातदाराला मोसंबीच्या बागा ठेवाव्यात कि नाही काही समजेनासे झालं. अशा परिस्थितीत शासनाने व कृषी विभागाने तातडीने शेतकऱ्याच्या बागेत जाऊन पंचनामा करून शेतकऱ्यांना योग्य ते उपाययोजना करण्याचा सल्ला द्यावा व त्यांना आर्थिक मदत देण्याची आज नितांत गरज आहे. अशी मागणी ही शेतकरी वर्गाकडून व शेतकरी संघटना कडून जोर धरू लागली आहे

# श्याम पाटील नळगे काँग्रेस युवक शहराध्यक्षपदी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** आगामी काळात पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, विधानसभा व लोकसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत त्या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात मोठे बदल तसेच जिल्हा पातळी पासून ग्रामीण भागातील बूथ बांधणीचे काम वेगात सुरू झाले असून त्यानुषंगाने सर्व शाखांच्या पदाधिकारी निवड करण्यात येत आहेत. काँग्रेस पक्षाच्या लोहा युवक शहराध्यक्ष पदी युवा कार्यकर्ते श्याम पाटील नळगे यांची नुकतीच निवड करण्यात आली असून त्यांना निवडीचे पत्र पक्ष प्रमुखांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. मागील अनेक कालावधी पासून श्याम नळगे यांनी सामाजिक कामांच्या माध्यमांतून समाजात स्वतःचे स्थान निर्माण केले असून प्रारंभी पासूनच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात सर्वसाधारण कार्यकर्ता म्हणून काम करत असताना पक्षाचे ध्येय धोरण तळागाळात पसरवून काँग्रेस पक्ष अधिक व्यापक व मजबूत होण्यासाठी अविरत प्रयत्न केले. त्यांच्या कार्याची दखल घेत माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली श्याम पाटील नळगे यांची पक्षाच्या लोहा युवक युवक शहराध्यक्ष पदी निवड करण्यात आली. जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष तिरुपती (पप्पू) पाटील कोंढेकर यांच्या सहीचे नियुक्ती पत्र नळगे यांना माजी मंत्री डी. पी. सावंत, आ. अमरनाथ राजूरकर, माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ. हनुमंत पाटील बेटमोगरेकर, जिल्हाध्यक्ष गोविंदराव पाटील लोहा तालुका अध्यक्ष शरद पाटील पवार नगेलीकर आदींच्या हस्ते देण्यात आले.



# सोहम प्रकाश प्राथमिक शाळेत बक्षीस वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यात पिशोर येथील सोहम प्रकाश प्राथमिक शाळेत शुक्रवार रोजी बक्षीस वितरण सोहळा पार पडला. आजादी का अमृतमहोत्सव वर्षाच्या शेवटच्या पर्वामध्ये शाळेत स्वतंत्र दिनाच्या निमित्ताने क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडासाप्ताहात सांघिक व वैयक्तिक असे वेगवेगळ्या प्रकारचे सामने घेण्यात आले त्यामध्ये कब्बडी, खो-खो, धावणे, संगीत खुर्ची, लिंबू चमचा, थैला रेस, दोरी इ. क्रीडाप्रकार घेण्यात आले. अतिशय उत्साह पूर्ण व रोमांचपूर्ण सामने पार पडले. या मध्ये विजयी झालेले संघ यांना बक्षीस देण्यात आले तसेच वैयक्तिक क्रीडाप्रकारात विजयी झालेल्या खेळाडूंना पुढे अजुन उल्लास वाढावा या करिता देखील बक्षीस देण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक अमोल लोखंडे व सर्व वर्गाचे वर्गशिक्षक यांच्या शुभहस्ते बक्षीस वितरण पार पडले. शाळेतील क्रीडाविभाग प्रमुख कावले सर यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्कृष्ट नियोजनामध्ये क्रीडा सप्ताह पार पडला. तसेच स्वतंत्र दिनाच्या दिवशी ग्रामपंचायत पिशोर येथे शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट असा सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला. या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनासुद्धा बक्षीस वितरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांना बक्षीस मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी मेहनत घेतली. बक्षीस वितरण सोहळा यशस्वी पार पडला. यावेळी शाळेचे अजय परदेशी, योजना कुलकर्णी, श्रीमती मोकासे मैडम (मेम्बर) यांच्या सोबत शिक्षक विद्यार्थी यांची मोठ्या संखेने उपस्थिती होती.





# शिक्षक सेनेचे शिक्षण आयुक्तांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त सुरज मांढरे काल दि.(२३) ऑगस्ट रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठूभाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांच्या विविध मागण्यांचे निवेदन देऊन प्रश्नाबाबद चर्चा केली व शिक्षक सेनेच्या वतीने स्वागत करण्यात आले. सदरील निवेदनात जि. प. शाळेच्या सर्व खोल्यांचे संरचनात्मक लेखा परीक्षण करण्याच्या प्रमुख मागणी सह विविध मागण्या नमूद केल्या. केंद्रप्रमुखांची पद तात्काळ भरा, सातव्या वेतन आयोगाची हप्ते जमा करण्यासंदर्भात अनिमियमिततेची चौकशी करा, शिक्षकांची थकीत वेतन,वैद्यकीय बिल सहा सहा महिन्यापासून प्रलंबित आहेत, शिक्षकांचे अशैक्षणिक कामे काढून घेणे पदोन्नत मुख्याध्यापकांची पदं भरणे, 24 वर्ष झालेल्या शिक्षकांना निवड श्रेणी मिळणे, विद्यार्थ्यांचे स्काऊट गाईडचे गणवेश रकमेत वाढ करणे. विषय शिक्षकांची रिक्त पदे भरणे, वेतनश्रेणी देणे शालेय माहितीचे टप्पे कालबद्ध पद्धतीने मागविणे यासह आदी मागण्यांचे पाच पानी निवेदन जि प शाळा आणि शिक्षकांशी संबंधित आदी मागण्यांचे निवेदन शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांना देण्यात आले. यावेळी शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण, संतोष अंबुलगेकर, गंगाधर ढवळे, बालाजी भांगे, लहू पंदलवाड, हेमा जोशी मॅडम,शि रसाळकर, रामदास देशमुख, संभाजी पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# ॲस्ट्रल फाऊंडेशनकडून विविध वस्तू भेट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील केंद्रीय प्राथमिक शाळेस ॲस्ट्रल फाऊंडेशन अहमदाबाद व ॲस्ट्रल पाईप्स व वाटर टॅन्क लि. पांगरा यांच्याकडून जि.प.उच्च प्राथमिक शाळा सावंगी बाजार शाळेला शालेय व विद्यार्थी उपयोगी विविध साहित्य भेट देण्यात आले कॉम्पूटर संच 1स्मार्ट टि.व्ही.संच 1प्रिंटर व स्कॅनर 1 संचइलेक्ट्रिक बेल 1लोखंडी अलमारी 7लाकडी टेबल 7 खुर्च्या 17सिलिंग फॅन 17 साउंड सिस्टीम 1नोटीस बोर्ड 8 व्हाईट बोर्ड 8 प्लॅस्टिक मॅट 4 ही सर्व साहित्य आज दिनांक २२ रोजी भेट दिली. यावेळी ॲस्ट्रल फाऊंडेशनचे डायरेक्टर श्री गिरीश जोशी,श्री रमेशजी पवार, संजय पटेल, विनोद क्षीरसागर, बी.के.भुसारे, संदिप बोराडे, विठ्ठल वसमतकर, ज्ञानेश्वर शिंदे, दिनेश पाटील व सर्व वीज जोडणी सहायक. सर्वश्री अप्पाराव नलावडे सरपंच,कारभारी नलावडे, पोपट काटकर, वसंतराव नलावडे,ज्ञानेश्वर नलावडे, रत्नाकर मुळे, सय्यद लाल, रमेश नलावडे, कैलास गायकवाड, अन्य प्रतिष्ठित ग्रामस्थ व पालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मु.अ. श्रीमती.मंगला तिळवणे मॅडम, श्रीमती वृषाली भदे मॅडम, अशोक महालकर, श्रीकृष्णानंद मगर, अमोल खंडागळे, विजय अणदूरे, राणी डुमाले, श्रीमती जयश्री गायकवाड, श्रीमती जयश्री जोंजाळ, श्रीमती कावेरी देवराये यांनी परिश्रम घेतले.





# जंगलव्याप्त शेतशिवारात वन्यप्राण्यांचा हैदोस; शेतीचे नुकसान

## वनविभागाने तार कुंपण करण्याची शेतकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

एकनाथ आवचार

चारठाणा : चारठाण्यासह अनेक ग्रामीण भागातील खेडे पाडे व तालुक्यातील अनेक गावे ही जंगलव्याप्त परिसरात गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्यास आहेत व त्या नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेतीसह जोडधंदा म्हणून पशूपालन आहे. डोंगराळ भागात असलेल्या शेतातील धान पिकावर जंगली प्राण्यांचा उपद्रव, हैदोस दिसून येत असून चारठाणा ,मोहाडी,हानवतखेडा, सावरगाव, सावरगाव तांडा, ब्राम्हणगाव यांच्यासह येथील परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शेतातील खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होत असून यायामध्ये आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे बनविभागातर्फे तार कुंपन करावे, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे. या परिसरात अनेकदा पाळीव जनावरांवर हल्ला होत असून या डोगराळ भागात बिबट, वाघ, रानडुक्कर,हरीण, अस्वल, रानम्हैसी असे अनेक हिंस्त्र प्राणी वावरत असतात. त्यामुळे शेतकरी बांधवात भितीचे वातावरण आहे. दरवर्षी धान्य पेरणी, लागवड व नंतर कटाई करीता तयार झालेला धान्यची जंगली प्राण्यांकरवी नासधूस करीत असते व ही तक्रार चारठाणा येथील वनकार्यालय व परभणी मुख्यालय वनविभाग कार्यालय परभणी यांना नुकसानग्रस्त शेतकरी देत असतात व वनविभागातर्फे नुकसान पंचनामे करून थातूरमातूर चौकशी करून प्रकरण निकाली काढतात. एवढेच नव्हे तर तार कुंपन किंवा झटका मसीन देऊ असे शेतकऱ्यांना आश्वासीत करून मोकळे होतात. शेतकरी मात्र विश्वासावर राहून पुढील वर्षी आपले वन्यप्राण्यांपासून रक्षण होईल व चांगले उत्पन्न येईल, कर्जाचे डोंगर कमी होईल. अच्छे दिन



येतील म्हणून आनंदित होतो आहे. परंतू दरवर्षी शेतशिवाराचे वन्यप्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणात नासधूस होत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतातील पिकाची नुकसानभरपाई तुटपुंजी ती सुद्धा दोन वर्षानंतर मिळतो. तसेच पशुपालकांच्या पाळीव प्राणी शेळी, गाय, म्हैस, बैल यांच्यावर वन्यप्राण्यांचे हल्ले हे नेहमीच होत असतात. अनेकदा गोठ्यातील शेळ्यांवर तसेच पाळीव प्राण्यावर हल्ले चढवून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे शेतकरी व पशुपालकाचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी वनविभागाने जंगल सभोवताल ताराचे कुंपन तसेच झटका मसीन लावण्यात यावी, अशी मागणी चारठाण्यासह परीसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# चित्तातील मलिनता वाईट कर्म करण्यास प्रवृत्त करते : ह.भ.प. रामगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** मानवाच्या चित्तातील मलिनता मानवाला वाईट कर्म करण्यास प्रवृत्त करते,ही मानवी मनातील मालिनता दूर करण्याचे महान कार्य सदगुरू गंगागिरी महाराज आणि ब्रह्मलीन नारायणगिरी महाराजांनी सप्ताहाच्या माध्यमातून करून समाजात शुद्ध चित्ताच्या बिजांचे रोपण करून मानवता धर्म उभा केला असे अमृततुल्य विचार सरला बेट(गोदाधाम)चे मठाधिपती हभप रामगिरी महाराज यांनी १७६व्या सदगुरू गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहच्या तिसऱ्या दिवशी बुधवार(ता.२३) रोजी सप्ताह स्थळी प्रवचनाचे द्वितीय पुष्प गुंफताना केले. ते पुढे म्हणाले की जो पर्यंत मनात अनन्यभाव येत नाही तो पर्यंत ईश्वर कृपा होत नाही, यासाठी त्यांनी भगवतगीतेच्या नवव्या अध्ययातील २२व्या श्लोकचा दाखला दिला. आजच्या अफाट जनसमुदायाची उपस्थिती पाहून ते म्हणाले की, सदगुरू गंगागिरी महाराज व ब्रह्मलिन नारायण गिरी महाराज यांनी समाज व समाजमन जोडण्याचे कार्य अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून केले तोच वसा आजही या अफाट भक्त



-भाविकांच्या उपस्थिती वरून दिसून येत आहे.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती त्यानी आपल्या मनोगतातून महाराष्ट्र राज्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या स्थिती वर बोलतांना भगवंताला खूप पाऊस पडू दे,नदी, नाले, विहिरी, तुडुंब भरू दे व बळीराजा सुखाऊ दे अशी प्रार्थना केली व महाराजांना ही भगवंत चरणी पाऊस पडू दे अशी प्रार्थना करावी अशी विनंती केली.

या प्रसंगी सप्ताह कमिटीचे अध्यक्ष आ. रमेश पा, बोरनारे, उपाध्यक्ष साबेरखान,कार्याध्यक्ष डॉ,दिनेश परदेशी, सचिव बाबासाहेब जगताप, राजेंद्र साळुंके,पारस घाटे यांनी मान्यवरांचा सत्कार केला, माजी आ.आर. एम. वाणी यांच्या पत्नी श्रीमती सुमनबाई वाणी यांचा ही सन्मान करण्यात आला. सूत्र संचलन व आभार माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले,या प्रसंगी माजी आ. कै. आर.एम. वाणी यांच्या पत्नी सुमनबाई वाणी, आ,भाऊसाहेब चिकटगावकर, संजय निकम, प्रशांत सदाफळ, अविनाश गलांडे, सचिन वाणी, ज्ञानेश्वर जगताप, डॉ. राजीव डोंगरे, प्रकाश चव्हाण मोहन साळुंके, शोभाचद संचेती, अमोल बावचे, पी.जी. पवार संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगाव, येवला येथील मान्यवर उपस्थित होते,आजही दोन लाख भक्त भाविकांनी महाप्रसाद ग्रहण केला.



# रायगड प्रकल्पग्रस्त आणि जनरल कामगार संघटनेने केला पगारवाढीचा यशस्वी करार

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** कामगार क्षेत्रात रायगड प्रकल्पग्रस्त आणि जनरल कामगार संघटना ही संघटना गेली 14 वर्षांपासून काँग्रेसचे तालुका अध्यक्ष तथा कामगार नेते विनोद म्हात्रे व शिवसेना तालुका संघटक बी एन डाकी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तमपणे कार्यरत आहे. संघटनेची आजपर्यंत वाटचाल ही उत्तम राहिलेली आहे. सदर संघटना कामगारांच्या कल्याणासाठी रात्रंदिवस झटत असून उरण तालुक्यातील खोपटा येथे अमेया लॉजिस्टिक कंपनीत 130 कामगार कार्यरत असून हे कामगार या संघटनेचे सक्रिय सभासद आहेत . सदर कामगार संघटनेची घोडदौड यशस्वीपणे सुरु असून अमेया लॉजिस्टिक कंपनीत लोकल लेबर यांचा सलग चौथ्यांदा विक्रमी असा 7100 रुपयेचा भरघोस वेतन करार नुकताच संपन्न झाला. सलग चौथ्यांदा विक्रमी पगारवाढ करणारी रायगड प्रकल्प आणि जनरल कामगार संघटना ही एकमेव कामगार संघटना आहे. 15 वर्षांपासून अमेया लॉजिस्टिक कंपनी मध्ये सदर संघटना कार्यरत असून संघटनेचे संस्थापक विनोद म्हात्रे व बी एन डाकी यांच्या नेतृत्वामुळे तब्बल 7100 रुपयाचा वेतन वाढ कामगारांना मिळाले आहे. विनोद म्हात्रे तसेच बी. एन. डाकी यांच्या नेतृत्वामुळे कामगारांना नेहमी न्यायच मिळाला आहे. यंदाही लेबर कामगारांना 7100 पगार वाढ झाला.अमेया लॉजिस्टिक कंपनीत हा करार झाला असून यावेळी पर्ल फ्रेंड चे मॅनेजर विशाल पाटील, शरद सर, रायगड़ प्रकल्पग्रस्त आणि जनरल कामगार संघटनाचे संस्थापक विनोद म्हात्रे , जनरल सेक्रेटरी राजन पाटील यांच्यासह कामगार प्रतिनिधी - हरेश ठाकूर, सुरज मढवी, संतोष माळी, प्रवीण म्हात्रे, मनोज म्हात्रे, ऋषिकेश म्हात्रे, हेमंत म्हात्रे, मिजेश म्हात्रे, प्रशांत केदारी, रविंद्र मोकल, अनिकेत गोंधळी, विनोद म्हात्रे व इतर कामगार प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वाच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक करार संपन्न झाला. अमेया लॉजिस्टिक कंपनीतील कामगारांना भरघोस पगारवाढ झाल्याने लेबर कामगारांनी कामगार नेते विनोद म्हात्रे, बी. एन. डाकी व संघटनेचे मनपूर्वक आभार मानले. फटाके फोडून व प्रत्येकाला पेढे वाटून कामगारांनी यावेळी आनंदोत्सव साजरा केला.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर